# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३ / श्रावण ११, १९४५ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) विशेष सहाय्य मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(४) मृद व जलसंधारण मंत्री**
**(५) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री**
**(६) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५१**

---

**राज्य लोकसेवा आयोगामार्फतच्या पदभरती प्रक्रियेचा कालावधी कमी करण्याबाबत**

**(१) * १९९८३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा परिक्षेची अधिसूचना दिनांक १० फेब्रुवारी, २०२० रोजी जारी करून सदर परिक्षेचा अंतिम निकाल दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी जाहीर केला आहे, त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रारी, कायदा आणि न्यायविषयक संसदीय स्थायी समितीने उमेदवारांचे वय उलटून जाणे, उमेदवारांच्या शारिरीक व मानसिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होणे, इ. बाबी लक्षात घेवून भरती प्रक्रियेचा कालावधी कमी करण्याची शिफारस केल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य लोकसेवा आयोगामार्फत सन २०२०-२०२१ मध्ये घोषित करण्यात आलेल्या विविध पदांच्या भरती प्रक्रियेशी संबंधित उमेदवारांच्या मुलाखतीचे आयोजन आता करण्यात आल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या बहुतांशी स्पर्धा परिक्षांमध्ये उमेदवार निवडीचे प्रमाण १:१० किंवा १:१५ इतके असतानाही लघुलेखन पदाच्या भरती प्रक्रियेत लघुलेखन व मौखिक चाचणीसाठी १:३ प्रमाणात उमेदवार निवडण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लघुलेखन पद भरतीच्या जाहिराती ३ ते ४ वर्षांतून एकदाच येत असल्यामुळे लघुलेखन करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत असून लघुलेखन पदभरती दरम्यान उमेदवार निवडीचे प्रमाण हे १:१० किंवा १:१५ इतके करण्याबाबत या क्षेत्रातील उमेदवारांकडून शासनाकडे सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य लोकसेवा आयोगामार्फत पदभरती प्रक्रियेकरिता लागत असलेला कालावधी कमी करण्याबाबत तसेच लघुलेखन पदभरतीमध्ये उमेदवार निवडीचे प्रमाण १:१० अथवा १:१५ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सामान्य प्रशासन विभागास तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगास याबाबत कोणतीही शिफारस प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
(५) महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिकदृष्ट्या स्वायत्त संस्था असून परीक्षेचे आयोजन तसेच परीक्षेची कार्यपध्दती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ठरविण्यात येते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पद भरतीकरिता पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा, शारिरीक चाचणी व मुलाखत असे टप्पे असून विविध परीक्षा योजनेप्रमाणे याबाबत उचित कालावधीमध्ये कार्यवाही करण्यात येते. लघुलेखक संवर्गांतील पदभरतीकरिता चाळणी परीक्षेचे आयोजन आयोगातर्फे करण्यात येते. चाळणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होणा-या उमेदवारांस लघुलेखन कौशल्य चाचणी व मुलाखतीसाठी वर्गवारीनिहाय १:५ या प्रमाणात पात्र करण्यात येते. आयोगाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या कोणत्याही संवर्गाच्या मुलाखतीसाठी १:१० अथवा त्यापेक्षा जास्त प्रमाण ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे लघुलेखक पदभरतीसाठी देखील आयोगाच्या प्रचलित आदेशानुसार १:५ प्रमाणातच लघुलेखन कौशल्य चाचणी व मुलाखतीसाठी उमेदवार निवडण्याची कार्यवाही आयोगाकडून करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (बार्टी) मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षा भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्याबाबत

**(२) * १८८७१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अरुण लाड, श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्रातील ३० प्रशिक्षण संस्थांमार्फत सन २०१२ पासून कौशल्य प्रशिक्षण केंद्राकडून सुलभपणे प्रशिक्षण दिले जात असून सदर प्रशिक्षण संस्थांमार्फत उत्तम प्रकारे प्रशिक्षण राबविण्यासाठी ५ वर्षासाठी समयबध्द कार्यक्रम आखून दिला असल्याची बाब व अनुसूचित जातीमधील युवक युवतींसाठी मिलीटरी व पोलीस ट्रेनिंग देण्यात येणार असून याकरिता खाजगी संस्थेच्या माध्यमातून हे ट्रेनिंग सुरु करण्यात येत असून त्याची निवड करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदेच्या जाहिरातीमध्ये

नागपूर जिल्हा वगळण्यात आला असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चुकीच्या कार्यपध्दतीमुळे राज्यातील पोलीस भरतीसह इतर शासकीय स्पर्धा परीक्षेकरिता सराव करणाऱ्या जवळपास १० हजार विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याची बाब दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३० प्रशिक्षण संस्थांपैकी १६ जिल्ह्यातील प्रशिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांची निवड न केल्यामुळे २० हजार विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून सदर प्रकरणी तात्काळ निर्णय न घेतल्यास पोलीस भरती, बँक, रेल्वे, एलआयसी व इतर लिपिकवर्गीय परीक्षेच्या तयारीसाठी प्रयत्न करणारे २० हजार विद्यार्थी प्रशिक्षणापासून वंचित राहणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासकीय स्पर्धा परीक्षांकरिता उत्तमरीत्या सराव व तयारी करण्याकरिता बार्टीमार्फत राबविण्यात येणारे कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुलभरीतीने सुरू करण्यासाठी तसेच नागपूर जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील युवक युवतींवर अन्याय करणारी निविदा प्रक्रिया राबविण्याऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१)डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत बँक (IBPS), रेल्वे, L.I.C. इत्यादी तत्सम स्पर्धा परिक्षांचे प्रशिक्षण आणि पोलीस व मिलीटरी भरती पूर्व प्रशिक्षण राबविण्याबाबत सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. याबाबत बार्टीमार्फत ३६ जिल्ह्यात निविदा प्रसिध्द करण्यात आली. यामध्ये नागपूर या ठिकाणी काढण्यात आलेले निविदेमध्ये एकही संस्था पात्र न झाल्याने पुन्हा निविदा प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिकांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने निर्णयाच्या अधीन राहून ई-निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) व (३) या करिता सन २०२२-२३ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत बँक (IBPS),रेल्वे, L.I.C. इत्यादी तत्सम स्पर्धा परिक्षांचे प्रशिक्षण करिता ९००० विद्यार्थीना प्रशिक्षण देण्यात आले असून पोलीस व मिलीटरी भरती पूर्व प्रशिक्षण करिता ३००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे असे एकूण १२००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण या संस्थेकडून (बार्टी) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जेईई व नीट या प्रवेश परीक्षांचे प्रशिक्षण देण्याबाबत

**(३) * १९८७५ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी) या संस्थेकडून इयत्ता १० वीमध्ये ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जेईई व नीट या प्रवेश परीक्षांचे प्रशिक्षण दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरुवातीला या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्याचे ठरविण्यात आले, परंतु यामध्ये बदल करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला, परंतु प्रशिक्षणासाठी संस्था निवडण्याची प्रक्रिया तसेच प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया अद्याप सुरु झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया माहे मे, २०२३ मध्ये सुरू करणार असल्याची माहिती डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जेईई व नीट या प्रवेश परीक्षांचे प्रशिक्षण मिळण्याकरिता कोणती योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) इयत्ता १० मध्ये गुणानुक्रमे सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील समाजकल्याण विभागाच्या ०७ प्रादेशिक विभागाच्या ठिकाणी १०० विद्यार्थ्यांना जेईई व १०० विद्यार्थ्यांना नीट या प्रवेश परिक्षांचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत घेण्यात आला आहे.

(२) इयत्ता १० मध्ये ९० टक्याहून अधिक गुण मिळविणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्याच्या योजनेचा प्रस्ताव स्वतंत्रपणे शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) होय.

(४) जेईई, नीट या प्रवेश परिक्षांचे प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याची कार्यवाही सुरू असून नागपूर येथे संस्था निवड झाली असून प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

# उरण (नवी मुंबई) येथील सिडको प्रकल्पग्रस्त साडेबारा टक्के योजनेतंर्गत भूखंड वाटपाच्या प्रतीक्षेत असल्याबाबत

**(४) * १९८७० श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण, नवी मुंबई येथील सिडको प्रकल्पग्रस्त मागील ३३ वर्षांपासून साडेबारा टक्के विकसित भूखंडाच्या प्रतीक्षेत असताना सिडकोकडून नव्याने भूसंपादन केल्या जाणाऱ्या जमिनीच्या बदल्यात साडेबावीस टक्के भूखंड वाटपाची तयारी करीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने प्रथम प्रलंबित साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप करावे तसेच साडेबारा टक्के भूखंडाचे मावेजासह चुकीची आकारणी बंद करुन सिडकोच्या नोकर भरतीत प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे या मागण्या करत शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोने शेतकऱ्यांच्या जमिनीची वाढीव भरपाई रक्कम विनाविलंब अदा करून चाणजे, नागाव व रानवड सह इतर गावातील भूसंपादनात येणाऱ्या राहत्या घरासंदर्भात आपली भूमिका जाहीर करण्याची मागणी स्थानिक जनतेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नवी मुंबई प्रकल्पासाठी अधिसूचित मात्र असंपादित खाजगी जमिनीच्या संपादनाच्या मोबदल्यापोटी रोख रकमेऐवजी २२.५% विकसित भूखंड देण्याबाबत शासन निर्णय दिनांक १/०३/२०१४ व दिनांक २८/०२/२०१८ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्यापोटी २२.५% विकसित भूखंड वाटप करण्यासंदर्भात सिडको संचालक मंडळापुढे दिनांक २९/०४/२०२३ रोजी संगणकीय सोडत घेण्यात आली आहे.

(२) भूधारकांनी दिनांक २७/०४/२०२३ रोजी धरणे आंदोलन केले होते.

(३) सिडको महामंडळाकडून वाढीव मोबदल्याची रक्कम (मावेजा) टप्प्या-टप्प्याने अदा करण्यात येत आहे. दिनांक २१/०४/२०२३ रोजी द्रोणागिरी नोडमधील १२.५% योजनेंतर्गत प्रकल्पग्रस्तांना प्रलंबित भूखंडाचे वाटप करणेबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) १२.५% योजनेंतर्गत भूखंड वाटपासाठी आवश्यक क्षेत्रासाठी उरण तालुक्यातील बोकडवीरा, पागोटे, चाणजे, नागाव, रानवड, नवघर, फुंडे या गावातील जमिनीचे संपादन करण्यासाठी अधिसूचना दिनांक १२/१०/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून त्यानुषंगाने संपादनाची कार्यवाही सुरू आहे.

संपादित होणाऱ्या जमिनीमध्ये निवासी बांधकाम असल्यास सदर बांधकामाचे घसारामूल्य देण्याबाबतच्या सिडकोच्या ठराव क्र.१२५७२ ला शासनाने दिनांक १०/०५/२०२३ रोजी मान्यता दिली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# अकोला जिल्ह्याकरिता वाढीव हरभरा खरेदीचे उद्दिष्ट प्राप्त करुन अनुदान जाहीर करण्याबाबत

**(५) * १८९५५ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात माहे मार्च, एप्रिल, २०२३ मध्ये झालेला अवकाळी पाऊस, गारपीट व बारदाणांची टंचाई इत्यादी कारणांमुळे नाफेडने हरभरा खरेदी बंद केल्याने शेतकऱ्यांचा हजारो क्विंटल हरभरा पडून राहिल्यामुळे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात १ लाख २१ हजार हेक्टर वर हरभरा पेरा असताना फक्त ४ लाख १२ हजार ९०२ क्विंटल इतकाच हरभरा नाफेडमार्फत खरेदी करण्यात येऊन अनेक छोट्या शेतकऱ्यांच्या हरभऱ्याची खरेदी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्याला वाढीव हरभरा खरेदीचे उद्दिष्ट प्राप्त करुन हरभऱ्यास अनुदान जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) अकोला जिल्ह्यात माहे मार्च व एप्रिल, २०२३ या कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस झाला असून गारपीठ सुध्दा झाली होती.

हंगाम २०२२-२३ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार नाफेडमार्फत चना खरेदी करण्यात आली. केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार अकोला जिल्ह्यात चना खरेदीकरिता २७/०२/२०२३ पासून शेतकरी नोंदणी सुरु करण्यात आली असून प्रत्यक्षात चना खरेदी दिनांक १४/०३/२०२३ पासून सुरु करण्यात आली होती. चना खरेदीकरिता ८ नोडल एजन्सीमार्फत एकूण ३५ खरेदी केंद्र कार्यान्वित करण्यात आले होते.

माहे एप्रिल अखेर अकोला जिल्ह्यात ४,१२,९०२ क्विंटल चना खरेदी करण्यात आली होती. केंद्र शासनाने चना खरेदीकरिता ८१.०० लाख क्विंटल खरेदीचे उदिष्ठ निश्चित करुन दिले होते. कृषी विभागाच्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार एकूण उत्पादनाच्या २५% खरेदी करण्याबाबतचे केंद्र शासनाचे निर्देश दिलेले आहेत. परंतु राज्य शासनाने नियुक्त केलेल्या स्टेट नोडल एजन्सीनी खरेदीमध्ये अनावश्यक स्पर्धा सुरु करुन जास्तीचे SMS शेतकऱ्यांना देऊन अपेक्षेपेक्षा जास्त खरेदी केल्यामुळे बुलढाणा, अमरावती, अकोला, हिंगोली व यवतमाळ या जिल्ह्यांचे खरेदीचे उदिष्ठ वेळेआधीच संपण्याची शक्यता पाहून शासनाने शेतकऱ्यांचे नुकसान होवु नये याकरिता ज्यांच्याकडुन हरभरा खरेदी शिल्लक आहे, अशा उर्वरित शेतकऱ्यांच्या संस्थेच्या प्रमाणात वेळावेळी जिल्हानिहाय अतिरीक्त खरेदीचे उदिष्ठ निश्चित करुन दिले होते.

अकोला जिल्ह्यासाठी दिनांक २७ एप्रिल, २०२३ व दिनांक २२ मे, २०२३ च्या शासन परिपत्रकानुसार इतर जिल्ह्यांचे अनुक्रमे ९१,९१४.७२ क्विंटल व १,००,००० क्विंटल अशी एकूण १,९१,९१४.७२ क्विंटल वाढिव उदिष्ठ देण्यात आले होते. त्यापैकी एकूण १,६८,३३४.२१ क्विंटल चना खरेदी करण्यात आलेली आहे तर शेतकऱ्यांकडून मागणी प्राप्त न झाल्याने दिलेल्या उद्दिष्टापैकी २३,५८०.५१ क्विंटल चना खरेदी झाली नाही.

(२) हे खरे नाही.

अकोला जिल्ह्यात चना खरेदीकरिता ३८,३२९ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना खरेदीसाठीचे SMS देण्यात आले होते. वाढीव उदिष्ठ दिल्यानंतर खरेदीच्या अंतिम दिनांक ११/०६/२०२३ अखेर सर्व नोडल एजन्सीमार्फत अकोला जिल्ह्यात २५,६०७ शेतकऱ्यांकडुन ५,८१,२३५.६८७ क्विंटल चना खरेदी करण्यात आला आहे. सदर कालावधीमध्ये नोंदणी झालेल्या सर्व शेतकऱ्यांना खरेदीसाठीचे SMS देण्यात आले असून खरेदी कालावधीमध्ये केंद्रावर शेतमाल घेवुन आलेल्या सर्व शेतकऱ्यांची चना खरेदी करण्यात आलेली आहे.

(३) अकोला जिल्ह्यात चना खरेदीकरिता ३८,३२९ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना खरेदीसाठीचे SMS देण्यात आले होते. वाढीव उदिष्ठ दिल्यानंतर खरेदीच्या अंतिम दिनांक ११/०६/२०२३ अखेर सर्व नोडल एजन्सीमार्फत अकोला जिल्ह्यात २५,६०७ शेतकऱ्यांकडुन ५,८१,२३५.६८७ क्विंटल चना खरेदी करण्यात आला आहे. सदर कालावधीमध्ये नोंदणी झालेल्या सर्व शेतकऱ्यांना खरेदीसाठीचे SMS देण्यात आले असून खरेदी कालावधीमध्ये केंद्रावर शेतमाल घेवुन आलेल्या सर्व शेतकऱ्यांची चना खरेदी करण्यात आलेली आहे. अकोला जिल्ह्यासाठी दिनांक २७/०४/२०२३ पर्यंत ९१,९१४.७२ क्विंटल चना खरेदीचे उद्दीष्ट देण्यात आले होते. तदनंतर दिनांक २२/०५/२०२३ पर्यंत १,००,०००.०० क्विंटल उद्दीष्ट देण्यात आले होते. सबब अकोला जिल्ह्यासाठी असे एकूण १,९१,९१४.७२ क्विंटल उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यापैकी एकूण १,६८,३३४.२१ क्विंटल चना खरेदी करण्यात आलेली आहे तर शेतकऱ्यांकडून मागणी प्राप्त न झाल्याने दिलेल्या उद्दीष्टापैकी २३,५८०.५१ क्विंटल चना खरेदी झाली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील कळवा, मुंब्रा व विटावा भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(६) * १९५७९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कळवा, मुंब्रा व विटावा भागाला भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून कळवा खाडीवर उभारण्यात आलेला तिसरा पूल छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे न उतरविता तो थेट पटनी मैदानाजवळ उतरविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहतूक कोंडी फोडण्याचा आराखडा अद्याप कार्यान्वित न झाल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची बाब दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवंडी बायपास ठाणे मुंबई नाशिक महामार्गावर सुरू असलेल्या रुंदीकरणाच्या कामामुळे व वाहतुकीचे नियोजन नसल्याने दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून भिवंडी ते ठाणे ह्या १८ किलोमीटरच्या प्रवासाला दोन ते तीन तासाचा वेळ लागत असल्याने चालक त्रस्त झाले असल्याची बाब

माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भिवंडी, ठाणे, नवी मुंबई, कळवा, मुंब्रा, विटावा व मुंबई महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने वाहतूक कोंडी दूर करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

कळवा खाडीवर ठाणे महानगरपालिकेने उभारलेल्या तीसऱ्या खाडी पुलास अतिरिक्त बाजू जोडून त्या रेल्वे मार्ग पार करुन पटनी मैदानाजवळ उतरविण्याचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे. कळवा मुंब्रा भागात वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी या प्रस्तावानुसार दोन स्वतंत्र मार्गिकाचे बांधकाम प्रस्तावित असून प्राधिकरणामार्फत तांत्रिक छाननी करण्यात येत आहे.
(३), (४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

भिवंडी बायपास मुंबई नाशिक महामार्गावरील साकेत व कशेळी पुलाच्या मास्टिक अस्फाल्टचे काम सुरू होते. त्यासाठी वाहतूक पोलीस विभागाकडून वाहतुकीचे नियोजन करण्यात आले होते. तसेच भिवंडी बायपास मुंबई नाशिक महामार्गावरील वाहन वर्दळ ही अस्तित्वातील रस्त्याच्या वाहन क्षमतेपेक्षा जास्त असल्याने काही भागात वाहतूक कोंडी होते. त्याकरिता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, केंद्र सरकार यांच्या अखत्यारित ठाणे ते वडपे (भिवंडी बायपास) ह्या महामार्गाचे आठ पदरी रस्त्याचे काम प्रगतीत आहे. सदरचे कामास महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ हे उद्योजक आहेत. सद्य:स्थितीत ३०% काम झाले असून माहे सप्टेंबर-२०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था सुधारणेच्या अनुषंगाने प्राधिकरणामार्फत विविध कामे प्रस्तावित करण्यात आली असून याकरिता सल्लागाराची नियुक्ती करुन त्यांचेमार्फत सुसाध्यता तपासणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे इ. प्रक्रिया प्राधिकरण स्तरावर सुरु आहे

-----------------

## खालापूर (जि.रायगड) येथील जांभरुंग धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(७) * १९६८९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर (जि.रायगड) येथील जांभरुंग धरण तब्बल ४३ वर्षांपासून अपूर्ण असून माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन शासनाने ठेकेदारास आगाऊ रक्कम म्हणून पावणे सहा कोटी रुपये देऊनही ठेकेदाराने काम न करता ठेकेदार पसार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९४२ मध्ये मंजूर झालेल्या जांभरुंग धरणासाठी ४९ लाख २० हजार ८४१ रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली होती व आता तोच खर्च ९१ कोटीं रुपयांवर पोहोचला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जांभरुंग धरणामुळे जांभरुंग, खरंचई, बीड खुर्द, वनी, केळवली, वांगणी, शिवगाव, घोडवली, नावंडे, अंजरून या दहा गावांना पाणीपुरवठा होणार असून १८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे तसेच रेल्वे पट्ट्यातील संपूर्ण परिसर या धरणाने हिरवागार होणार असून १९.४ हेक्टर वनखात्याच्या अखत्यारितील जमिनीसाठी केंद्र शासनाला ३.५ कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जांभरुंग धरणाचे काम पूर्णत्वास नेण्याबाबत तसेच सदर काम प्रलंबित ठेवणाऱ्या दोषी अधिकारी व ठेकेदारांविरोधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) नाही, हे खरे नाही.

ल.पा. योजना जांबरुंग ता.खालापुर, जि.रायगड या योजनेस मूळ प्रशासकीय मान्यता पाटबंधारे विभागाकडून दिनांक ०२/०२/१९८० रोजी अंदाजपत्रकास रक्कम रुपये ५९.२१ लक्ष इतक्या रक्कमेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानंतर सदर योजना डिसेंबर १९९३ साली मृद व जलसंधारण विभागाकडे हस्तांतरीत झाली आहे. संपादित वन क्षेत्राकरिता पर्यायी वनेत्तर क्षेत्र वेळेवर उपलब्ध न झाल्याने योजना कार्यान्वित होऊ शकली नाही. सदर योजनेसाठी लागणारी वन जमिनीचा ताबा दिनांक २२/०५/२०१९ रोजी मिळाल्यानंतर दिनांक २३/०५/२०१९ पासून धरणाचे काम सुरू झाले आहे.
(२) हे खरे नाही.

सदर कामासाठी भाग-२ चे कार्यारंभ आदेश जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा ठाणे यांनी दिनांक १०/०५/२०१९ रोजी दिले असून, सदर योजनेचे झालेल्या कामानुसार देयके अदा करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर योजनेवर आतापर्यंत रक्कम रुपये १८.३३ लक्ष इतका खर्च झालेला आहे. सद्य:स्थितीत पाऊस असल्याने काम बंद आहे. परंतु पावसाळ्यानंतर पुन्हा काम सुरु करून २ वर्षामध्ये काम पूर्ण करण्याचे विभागाचे नियोजन आहे.
(३) होय, हे खरे आहे.

जांबरूंग लघु पाटबंधारे योजना, ता.खालापूर, जि.रायगड या योजनेचा पाणीसाठा २९८७ स.घ.मी इतका असून या योजनेमुळे २३८ हे. एवढे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. सदर धरणामुळे जांभरुंग, खरंचई, बीड खुर्द, वनी, केळवली, वांगणी शिवगाव, घोडवली, नावंडे, अंजरून या गावांना त्याचा फायदा होणार आहे. या योजनेच्या बुडीत क्षेत्रामधील १६.३९१ हे. वन जमीन संपादन करण्यात आले असून त्यासाठी रक्कम रुपये ३४५.२० लक्ष इतका निधी वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे.
(४) सदर योजनेच्या संकल्पनास प्रशासकीय मान्यतेसाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून, सदर योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार सदर प्रकल्प पुढील दोन वर्षात पूर्ण करण्याचे विभागाचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण –डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(८) * १९५४० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण–डोंबिवली महानगरपालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात भूमाफियांनी अनधिकृत बांधकामे केली असून अनधिकृत बांधकामे पाडण्याची कारवाई करताना पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळत नसल्याचे कारण देऊन अनेकदा कल्याण–डोंबिवली प्रशासनातील अधिकारी कारवाई करण्यास चालढकल करीत असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेमधून अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश निघतात परंतु कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेमधील अधिकारी, पोलीस आणि भूमाफिया यांचे संगनमत असल्याने अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्यानंतरही पुन्हा नव्याने ती उभी राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामे पाडण्याकरिता वेळोवेळी पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, भूमाफियांना संरक्षण देणाऱ्या दोषी अधिकारी व पोलीस तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या भूमाफियांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द विहीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार (S.O.P.) निरंतर कार्यवाही करण्यात येते.

•कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्रात "प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी" यांच्या अधिपत्याखाली अनधिकृत बांधकामाविरूध्द गठित करण्यात आलेल्या अतिक्रमण विरोधी पथकामार्फत दैनंदिन निरंतर कारवाई करण्यात येते.

•अनधिकृत बांधकामांवर शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या पोलीस बंदोबस्तात वेळोवेळी निष्कासनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

•सन २०१५ ते ३१ डिसेंबर, २०२३ अखेरपर्यंत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत १३०८३ अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत तर ५४३ अनधिकृत बांधकामधारकांविरूध्द विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत.

(४) अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, सदरचे अनधिकृत बांधकाम, बांधकामधारकाने मुदतीत काढून न घेतल्यास, संबंधित प्रभागामार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते व संबंधित बांधकामधारकाकडून निष्कासनाचा खर्च वसुल करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद व तुळजापूर नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत

**(९) * १९००५ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद व तुळजापूर नगरपरिषद आस्थापनेवरील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसास/पाल्यास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याच्या अनुषंगाने नगर परिषदेतील प्रारूप प्रतिक्षासूची प्रसिद्धी करण्यामध्ये अनियमितता झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद व तुळजापूर नगरपरिषदेतील निलंबित मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यकाळामध्ये स्थायी पदाच्या २०% अनुकंपा तत्त्वावर पदे भरणे आवश्यक असताना पदे रिक्त नसतानाही पदे भरण्यात आल्याने सदर भरतीत अनियमितता झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थायी पदावर भरती करताना आस्थापनेवरील खर्चाची मर्यादा पाहणे आवश्यक असतानाही नगरपालिकेचे स्थायी निर्देश शासनाने वेळोवेळी केलेल्या अनुकंपा भरतीबाबतच्या आदेशांचे उल्लंघन केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निलंबित मुख्याधिकारी यांच्या कार्यकाळात अनुकंपा तत्त्वावर भरती झालेल्या कर्मचाऱ्यांची तसेच पदभरतीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करुन दोषींवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही,

उस्मानाबाद नगरपरिषद व तुळजापूर नगरपरिषद आस्थापनेवरील दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसास/पाल्यास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याच्या अनुषंगाने, प्रचलित नियमास अनुसरुन प्राप्त अर्जानुसार दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२१ रोजी प्रारुप प्रतिक्षासूची प्रसिध्द करण्यात आली होती. याबाबत विहित कालावधीत आलेल्या आक्षेपांवर निर्णय घेऊन दिनांक ०५ जुलै, २०२१ रोजी अंतिम प्रतिक्षासूची प्रसिध्द करण्यात आली.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही,

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक १५ जुलै, २०१० रोजीच्या पत्रानुसार नगरपरिषद आस्थापनेवरील अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना लागू असलेली आस्थापना खर्चाची अट शिथील करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दिनांक १६ मे, २०२३ रोजीच्या आदेशान्वये मुख्याधिकारी, नळदुर्ग नगरपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली गठीत चौकशी समितीच्या दिनांक १५ जून, २०२३ रोजीच्या अहवालानुसार, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ व नगरविकास विभागाच्या दिनांक ११ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूदींचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले. अस्थायी पदावर अतिरिक्त नियमबाह्य नियुक्त अनुकंपा कर्मचारी यांना शासन सेवेतून कार्यमुक्त करण्याचे संबंधित मुख्याधिकारी यांना जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या दिनांक १४ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच तत्कालीन मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद व तुळजापुर नगरपरिषद यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

या प्रकरणी अनुकंपा तत्वावर नियुक्त कर्मचारी यांनी मा.कामगार/औद्योगिक न्यायालय, लातूर येथे दाखल केलेल्या याचिकेमध्ये मा.न्यायालयाने दिनांक २३ जून, २०२३ रोजीच्या आदेशान्वये सदर कर्माचारी यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यासंदर्भात स्थगिती दिलेली असून, सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील ३५५ गावांना पावसाळयात पुर व दरडी कोसळण्याचा धोका असल्याबाबत

**(१०) * १९०८२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील ३५५ गावांना येत्या पावसाळयात पुराचा धोका निर्माण होण्याची दाट शक्यता जिल्हा प्रशासनाने वर्तविली असून, वरिष्ठ भूवैज्ञानिक तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार डोंगरमाथ्यावर व डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या १०३ गावांना दरडीपासून धोका उद्भवण्याची शक्यता असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाटांचे तडाखे, धो-धो कोसळणारा पाऊस,तकलादू संरक्षक भिंती यामुळे किनारपट्टीवरील घरांमध्ये पाणी शिरण्याची दाट भिती असून, बंधाऱ्यांची वेळोवेळी देखभाल-दुरूस्ती न केल्याने हजारो ग्रामस्थांना येत्या पावसाळयात जीव मुठीत धरूनच राहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील सदरहू ३५५ गावांना असलेला पुराचा धोका तसेच डोंगरमाथ्यावर व डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या १०३ गावांना दरडीपासून उद्भवणारा धोका यासंदर्भात गांभीर्याने विचार करून सदरहू ठिकाणी राहणाऱ्या हजारो ग्रामस्थांच्या जीविताच्या तसेच मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच कोणती खबरदारी घेण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यात १३६ गावे पुरप्रवण व २११ गावे संभाव्य दरडप्रवण गावे आहेत.

(२) नाही.

(३) रायगड जिल्ह्यातील तालुक्यातील दरडप्रवण गावे, पुरप्रवण गावे, या ठिकाणी आपतकालीन बाब उद्भवल्यास तात्पुरत्या स्थलांतरासाठी शाळा, समाजमंदीरे इ. ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देणेकामी गावनिहाय तलाठी, ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, कृषी सहाय्यक / कृषी सेवक, कोतवाल, पोलीस पाटील, आपदा मित्र/सखी, स्थानिक स्वयंसेवी संस्थामधील सदस्य मिळून पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच कोणत्याही आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देणेकामी जिल्ह्यातील सर्व कार्यालयांमध्ये २४x७ तास तालुका नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांची उभारणी करण्याबाबत

**(११) * १८९५१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण लोकसंख्येत ५० टक्के महिलांचा समावेश असून त्याप्रमाणात महिलांसाठी स्वच्छतागृहांची अपुरी संख्या पहाता सन २०१४ च्या महिला धोरणानुसार महिलांसाठी स्वच्छतागृहे उभारण्यात यावीत अशी मागणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ग्रामीण व नागरी) अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी पुरेशा संख्येने सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारून त्यामध्ये महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधितांना शासनस्तरावरून देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अपुऱ्या स्वच्छतागृहांमुळे महिलांची होणारी कुचंबणा लक्षात घेवून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

महिला व बाल कल्याणसाठीच्या योजना निश्चितीकरणाबाबत नगरविकास विभाग, शासन निर्णय दिनांक २९/०३/२०२२ अन्वये मुलींसाठी / महिलांसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृह बांधणे व दुरुस्ती करणे तसेच इतर उपाययोजनांबाबत सर्व जिल्हाधिकारी / महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) १.० अंतर्गत राज्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सार्वजनिक / सामुदायिक स्वच्छतागृहांची उभारणी केली आहे.

| अ.क्र. | घटक | उभारण्यात आलेली शौचालय संस्था |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक शौचालय | ७,१७,६४४ |
| २ | सामुदायिक शौचालय सीट्स | १,०४,९५४ |
| ३ | सार्वजनिक शौचालय सीट्स | ५५,३६३ |

महिलांसाठी सार्वजनिक / सामुदायिक स्वच्छतागृहामध्ये (सामुदायिक शौचालय १,०४,९५४ सीट्स + सार्वजनिक शौचालय ५५,३६३ सीट्स = १,६०,३१७ सीट्स मधून) महिलांसाठी ८३,८२९ सीट्स बांधण्यात आल्या आहेत.

तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक १२/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वच्छ भारत अभियान ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधकामाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार स्वच्छ भारत अभियान ग्रामीण अंतर्गत

सार्वजनिक ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृह उभारून त्यामध्ये महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यामध्ये स्वच्छ भारत अभियान ग्रामीण अंतर्गत सन २०१४-१५ ते दिनांक ०५/०७/२०२३ अखेर पर्यंत सुमारे २२,६१४ सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.
(४) निरंक

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाच्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) * १९६२७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाने विविध मल:निसारण आणि पूर निवारण कामांसाठी माहे मार्च, २०२३ मध्ये रुपये ८० कोटींच्या एकूण ५ निविदा काढल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामासाठी एकूण ११ कंत्राटदारांनी निविदा सादर केल्या असता सर्वात कमी बोली लावणाऱ्या कंत्राटदाराची निविदा मंजूर करण्यात आली तथापि, अंतिम टप्प्यात कंत्राटदार प्रतिसाद देत नसल्यामुळे याप्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार सर्वच कंत्राटदारांनी संगनमत केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निविदांची बोली लावताना कलमांचे उल्लंघन करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेने कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या आहेत काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी अतिरिक्त आयुक्त यांना सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाने माहे डिसेंबर २०२२ मध्ये पूर निवारण व नाले पुनर्बांधणीच्या विविध कामांसाठी रुपये ९८.३७ कोटीच्या ५ निविदा काढल्या होत्या.
(२) व (३) सदर निविदा प्रक्रियेमध्ये १८ निविदा प्राप्त झाल्या होत्या. यामध्ये ५ निविदाकारांनी प्रचलित दरांच्या तुलनेत सर्वात कमी दर भरल्याचे आढळून आले. यास्तव सदर ५ व इतर ९ अशा एकूण १४ निविदाकारांना महानगरपालिकेमार्फत कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेस कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर निविदा प्रकिया रद्द करुन फेरनिविदा मागविण्यात आल्या. या फेरनिविदांमधील लघुत्तम निविदाकारांना कार्यादेश देण्याकरीता प्रशासक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) सदर घटनेची पुनरावृत्ती टाळण्याकरिता १४ निविदाकारांची बयाणा ठेव रक्कम रुपये २,३५,६९,३००/- बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जप्त करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर शहरात अमृत योजनेंतर्गत पाणीपुरवठा सुरू न झाल्याबाबत

**(१३) * १९४२३ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरात जुनी पाणीपुरवठा योजना सुरु असल्याने केंद्र शासन, राज्य शासन आणि महानगरपालिका यांनी खर्चाचा वाटा उचलून तेथे अमृत योजना राबविण्यात आली. परंतु, या योजनेचे पाणी अजुनही शहरात वितरित केले जात नसल्यामुळे शहरातील अनेक प्रभागातील नागरिक आजही बोअरवेल, विहिरीचे पाणी वापरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमृत योजनेंतर्गत चंद्रपूर शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी सदरची योजना अंमलात आणून नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

चंद्रपूर शहरातील १५ झोनमधील भागात पिण्याचे पाणी पाईपलाईनद्वारे वितरीत करण्यात येत असून शहरास एक दिवसआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पाकरीता विविध विभागांच्या परवानग्या मिळण्यास विलंब तसेच, कोव्हीड महामारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे कामाच्या गतीवर परिणाम झाला आहे.

सद्य:स्थितीस सदर प्रकल्पाचे काम भौतिकदृष्ट्या ९५ % पूर्ण झालेले असून सदर योजनेंतर्गत प्रस्तावित बहुतांश कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच, प्रकल्प पूर्ण करण्याचे काम वेगाने सुरु असून प्रकल्प कार्यान्वित करण्याच्यादृष्टीने झोननिहाय कामे पूर्ण करून चाचणी घेण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत शहरातील ९५ % भागात पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला असून उर्वरित कामे लवकरच पूर्ण करण्याचे चंद्रपूर महानगरपालिकेचे नियोजन आहे. तसेच, प्रकल्पाच्या काम पूर्ण करण्यास विलंब झाल्याने महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील सीमा तपासणी नाक्यांचे खाजगीकरण न करण्याबाबत

**(१४) * १९७१२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन विभागाने राज्यातील २२ सीमा तपासणी नाके बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देण्याचा निर्णय घेतला असून राज्य परिवहन खात्यातील अनियमिततेला आळा घालण्यासाठी शासनाने राज्यातील १५ सीमा तपासणी नाक्यांवर संगणकीकृत तपासणी यंत्रणा सुरू करण्याचा निर्णय माहे मे, २०२३ मध्ये घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे तपासणी नाके नफेखोर, भांडवली, खाजगी कंपन्याना विकले जाणार असल्यामुळे जनतेची फसवणूक होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सीमा नाक्यांचे खाजगीकरण करण्याबाबतच्या निर्णयाचा फेरविचार करुन खाजगीकरणचा निर्णय मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक २५/०३/२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सीमा तपासणी नाक्यांचे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर आधुनिकीकरण व संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच दिनांक २७/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे चोरवड जि.जळगाव, मरवडे जि.सोलापूर, कागल जि.कोल्हापूर, देगलूर, जि.नांदेड व इन्सूली जि.सिंधुदूर्ग हे आधुनिक सीमा तपासणी नाके कार्यान्वित करुन सेवाशुल्क आकारण्यास मान्यता दिली आहे.
(२) नाही.
(३) लागू नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा मुख्यालयांच्या २० शहरांतील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) * १९८५१ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी जिल्हा मुख्यालयांच्या २० शहरांतील नागरिकांना पिण्याचे पाणी दररोज मिळत नसल्याची बाब एका सर्वेक्षणातुन माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यातील आठ जिल्हा मुख्यालयांच्या शहरात दररोज पाणी उपलब्ध होत नसून ७५ पैकी ३७ नगरपालिकांच्या हद्दीत ३ ते ८ दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने जनतेस अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आंतरराष्ट्रीय मानकानुसार मोठ्या शहरात दरडोई १३५ लिटर पाणी दररोज नागरिकांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना संबंधित शहरातील नागरिकांना दररोज पाणी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, शासनाने या शहरातील भविष्यातील संभाव्य लोकसंख्या व पाण्याची गरज लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे वितरणाचे नियोजन व उपाययोजना करण्याबाबत तसेच नागरिकांना दररोज दरडोई पाणी उपलब्ध करुन देणेबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय हे अंशतः खरे आहे.

(३) आंतरराष्ट्रीय मानकानुसार मोठ्या शहरात दरडोई १३५ लिटर पाणी दररोज नागरिकांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना संबंधित शहरातील नागरिकांना अस्तित्वातील अपुरी पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायतकालीन / जुनी पाणीपुरवठा योजना इ. कारणांमुळे दररोज पाणी उपलब्ध होत नाही असे निदर्शनास येते.

(४) व (५) राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांना शहरांमधील भविष्यातील लोकसंख्या विचारात घेऊन, नियमित व आंतरराष्ट्रीय मानकानुसार दरडोई पाणीपुरवठा करण्यासाठी राज्यात केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाची तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाची अंमबजावणी करण्यात येत असून त्यांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात येत असून त्याद्वारे शहरे जलशाश्वत करण्याचे शासनाचे नियोजन आहे.

-----------------

## नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातील पथदिव्यांच्या खांबावरुन खाजगी इंटरनेट वाहिन्या टाकल्याबाबत

**(१६) * १९५३० श्री.आमश्या पाडवी, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ‘ड’ वर्ग महानगरपालिका असलेल्या नांदेड व इतर महानगरपालिका क्षेत्रातील पथदिव्यांच्या खांबांवरून अनेक प्रकारच्या विद्युत वाहिनी तसेच खाजगी इंटरनेट केबल वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या खाजगी व्यावसायिक कामांच्या वाहिन्यांची संख्या “क “वर्ग व “ड ‘वर्ग महानगरपालिकेत/नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत यामध्ये जास्त आहे, तसेच खाजगी व्यावसायिक वाहिन्या पथदिव्यांच्या खांबावरून टाकताना स्थानिक प्राधिकरणाची परवानगी घेण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक ठिकाणी सदर खांबावरून वाहणारी वाहिनी तुटून रस्त्याने जाणाऱ्या वाहनचालकांचा अपघात तसेच पक्षी मृत पावल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी व्यावसायिक वाहिन्या पथदिव्यांच्या खांबावरून टाकताना स्थानिक प्राधिकरणाची परवानगी घेणे हे खाजगी इंटरनेट इत्यादी व्यावसायिकांना बंधनकारक केल्यास ते उत्पन्नाचे स्तोत्र ठरू शकतात व स्थानिक प्राधिकरणाचा महसूल वाढू शकतो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर खाजगी वाहिन्या काढून, पथदिवे खांबांवर वाहिनी टाकावयाची असल्यास खाजगी व्यावसायिक यांनी रीतसर परवानगी घेऊन शासनास महसूल भरून त्या पुनर्स्थापित करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे

तथापि, अशा अनधिकृत केबल वाहिन्या टाकल्याचे आढळून आल्यावर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना त्या वाहिन्या काढुन टाकण्याबाबत सुचना देण्यात येतील.

(३) हे खरे नाही,

महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत यांच्या हद्दीत अशी कोणतीही घटना घडल्याची नोंद अथवा तक्रार प्राप्त झाली नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२४२/नवि-२०, दिनांक १९/१२/२०२२ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थासाठी महाराष्ट्र दुरसंचार पायाभूत सुविधा मार्गदर्शक तत्वे, २०२२ निर्गमित करण्यात आली आहेत. यातील मुद्दा क्र.२२ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना त्यांच्या स्थानिक पातळीवर धोरण बनविण्याबाबत तरतूद आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नालासोपारा, आचोळे येथील सुसज्ज रुग्णालय व वसई येथील सर डी. एम. पेटीट रुग्णालयाच्या प्रस्तावित जोड इमारतींचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१७) * १८९२२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा, आचोळे येथील सुसज्ज २०० खाटांच्या रुग्णालयाचे आणि वसई येथील सर डी. एम. पेटीट रुग्णालयातील प्रस्तावित जोड इमारतींचे काम तातडीने पुर्णत्वास नेण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यानी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने नालासोपारा, आचोळे येथील सुसज्ज २०० खाटांच्या रुग्णालयाचे आणि वसई येथील सर डी. एम. पेटीट रुग्णालयातील प्रस्तावित जोड इमारतींचे काम तातडीने पुर्णत्वास नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाने त्याकरिता पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला आहे का,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नालासोपारा, आचोळे येथे सुसज्ज २०० खाटांच्या रुग्णालयाचे तसेच वसई येथील सर डी.एम.पेटीट रुग्णालयातील जोड इमारतीचे बांधकाम तात्काळ मार्गी लावुन पूर्ण करण्याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार आचोळे, नालासोपारा, आरक्षण क्र. ४५५, सर्वे नं. ६ येथील प्रस्तावित रुग्णालय बांधकाम प्रस्तावाअंतर्गत स्थानिक तक्रारी विचारात घेता, सदर जागेऐवजी आचोळे रस्त्याच्या दर्शनी भागातील पर्यायी जागा रुग्णालय बांधकामाकरीता हस्तांतर

करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे सादर करण्यात आला असून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच वसई येथील सर डी. एम. पेटीट रुग्णालयाच्या मागील बाजुस सर्वे नं. ५३/२ (अ) व ५३ या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये ७० वाढीव खाटांच्या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

उपरोक्त दोन्ही रुग्णालयाची कामे महानगरपालिकेच्या स्वनिधीतून करण्याची तजविज महानगरपालिकेने ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर-भंडारा महामार्गावरील शिवशाही बसेसच्या स्पॉट बुकिंगमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१८) * १९६७० प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १८१२२ ला दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-भंडारा मार्गावरील शिवशाही बसेसच्या स्पॉट बुकिंगमध्ये लाखो रुपयांची अनियमितता झाल्याप्रकरणी राज्य परिवहन महामंडळाने मे.ट्रायमॅक्स कंपनीला जबाबदार धरले असून सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी, राज्य परिवहन नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी राज्य परिवहन महामंडळास अहवाल क्र.२६७ सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत आणि त्यांच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी मे.ट्रायमॅक्स कंपनीकडून रुपये ५,०१,४१०/- एवढी वसुली रक्कम व रुपये १ लाखांचा दंड असे एकूण रुपये ६,०१,४१०/- (सहा लाख एक हजार चारशे दहा रुपये मात्र) ठोठावण्यात आलेला दंड राज्य परिवहन महामंडळाला प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दंडाची रक्कम वसूल करुन स्पॉट बुकिंग प्रकरणी मे.ट्रायमॅक्स कंपनीवर पुढील कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) तपासणी अहवालात वसुलीची व दंडात्मक कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानूसार सदर प्रकरणी ट्रायमॅक्स कंपनीचे बुकींग एजंट यांच्यावर जबाबदारी निश्चिती करून त्यांचेवर एफ. आय. आर. दाखल करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे दंडाची वसुली करण्यात आली आहे. तसेच सर्व व्यवस्थापकांवर एफ. आय. आर ची कार्यवाही करण्याच्या सुचना रा.प.महामंडळास देण्यात आल्या आहेत.

(३) होय.

(४) व (५) शासनाने दिनांक ०७/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मे. ट्रायमॅक्स कंपनीवर तात्काळ कार्यवाही

करण्याबाबत रा.प.महामंडळास सुचना दिल्या आहेत.

मे. ट्रायमॅक्स कडून रुपये ५,०१,४१०/- वसुली रक्कम व रुपये १ लाखांचा दंड असे एकूण रुपये ६,०१,४१०/- (रुपये सहा लाख एक हजार चारशे दहा मात्र) दंड ठोठावून वसूल करण्यात आला आहे.

-----------------

## मुस्लीम समाजाच्या विकासासाठी मौलाना आझाद रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टियटयूटची (मार्टी) स्थापना करणेबाबत

**(१९) * १९०४८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लीम समाजाचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय मागासलेपण दिवसेंदिवस वाढत असल्याने मुस्लीम समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी उपाययोजना कराव्यात त्यासाठी बार्टीच्या धर्तीवर मार्टीची स्थापना करण्यात यावी, अशी मागणीचे सेलू (जि.परभणी) येथील मुस्लीम समाजातील युवकांनी मा.मुख्यमंत्री महोदय तसेच उप विभागीय अधिकारी, सेलू यांच्याकडे सन २०२३ दरम्यान निवेदन सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्टी (मौलाना आझाद रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टियटयूट) ची स्थापना, मुस्लीम समाजाला ५ टक्के शैक्षणिक आरक्षण, उच्च व व्यावसायिक शिक्षणात ५० टक्के शुल्क सवलत व इतर मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) व (२) होय, उप विभागीय अधिकारी, सेलू यांच्याकडे सन २०२३ दरम्यान निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) अल्पसंख्याक समुदायाच्या सर्वांगिण विकासासाठी या विभागामार्फत शिष्यवृत्ती, प्रशिक्षण, वसतिगृहे, कौशल्य विकास, महिला सशक्तीकरण या सारख्या वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबादमधील सिडको हद्दीत बीओटी तत्वावर विकसित करावयाच्या बसस्थानकाचे बांधकाम सुरु करण्याबाबत

**(२०) * १८८३८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १०४१३ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील सिडको हददीत बीओटी तत्वावर विकसीत करण्यात येणाऱ्या बसस्थानकाच्या कामासाठी पाच वर्षांपुर्वी १८ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून त्याचे सन २०१९ ला भुमीपूजन करुनही सदर काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाचा विकास कर भरला नाही म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेने बसस्थानकाच्या नुतनीकरणाच्या कामाची परवानगी रोखून धरली असल्याचे दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिडकोने एस.टी.महामंडळाला सर्वेक्षण क्र.८१ मधील ३२८२५ चौ.मी.जागा ही भाडे करारावर दिली असून, परिवहन महामंडळाने सिडकोचे नाहरकत न घेता बीओटी धारकांसोबत सन २०२० मध्ये करार केला असून दस्तऐवज नोंदणीसाठी कमी शुल्क भरुन रुपये ५.६५ कोटीचा महसूल बुडवला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाचे म्हणण्यानूसार महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटी कंपनीकडे दोन कोटी रुपये थकीत असल्याने त्यातून सदर १ कोटी ३२ लाख रुपये वळते करुन घ्यावे व बसस्थानकाचे कामास परवानगी द्यावी, असा प्रस्ताव राज्य परिवहन महामंडळाने दोन वर्षांपूर्वी महानगरपालिकेस दिला असतानाही कार्यवाही केली नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर बस स्थानकाचे काम सुरु करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या घेऊन बांधकाम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) सदर बाब सिडको हद्दीतील बस स्थानकाबाबत नसून मध्यवर्ती बसस्थानकांच्या बांधकामाशी निगडीत आहे. महानगरपालिकेकडून १ कोटी २० लक्ष इतका विकास शुल्क भरणे बाबत कळविण्यात आले होते. मात्र रा.प.महामंडळ शासनाचा उपक्रम असल्यामुळे (एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या कलम-१२४-फ नुसार) विकास शुल्क माफ करणेबाबत महानगरपालिकेकडे विनंती करण्यात आली आहे. तथापि, अद्यापपर्यंत विकास शुल्क माफी बाबत निर्णय झाला नसल्यामुळे बांधकाम परवानगी प्रलंबित आहे.
(३) सिडकोने रा.प. महामंडळाला सर्व्हे क्र.८१ मधील ३२८२५ चौ.मी. जागा ९० वर्षाच्या भाडे करारावर दिलेली आहे. सिडको प्रशासनाने ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले असल्याने रा.प.महामंडळाने सन २०२० मध्ये ३० वर्षासाठी विकासकासोबत विकास करार केलेला आहे. तसेच मुद्रांक शुल्क जिल्हाधिकारी, औरंगाबाद-२ यांनी दस्तऐवज नोंदणीकरीता योग्य मुद्रांक शुल्कचा भरणा करुन घेतला आहे.
(४) सदर बाब मध्यवर्ती बसस्थानकांशी निगडित आहे. महानगरपालिका छत्रपती संभाजीनगरकडून मध्यवर्ती बसस्थानकाच्या पुनर्बांधणीच्या कामास बांधकाम परवानगीसाठीचा १,२०,७७,६००/- इतका विकास शुल्क भरणे व औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमि. (ASCDCL) कडून रा.प.महामंडळाचे येणे असलेले भाडे या दोन वेगळया बाबी आहेत.
(५) व (६) मध्यवर्ती बसस्थानकांची बांधकाम परवाना मिळत नसल्यामुळे कंत्राटदाराला सदर काम रद्द करणे विषयी विनंती नुसार काम रद्द करुन सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात आली आहे व सदर ठिकाणी बीओटी तत्वावर बसस्थानक बांधण्याचे प्रस्तावित आहे.

सिडको हद्दीतील बीओटी तत्वावरील बसस्थानक बांधण्याकरीता सिडको प्रशासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. प्रकल्पाचे संकल्पिय आराखड्यांना दिनांक ०४/०७/२०२३ रोजी मंजूरी देण्यात आली आहे. विकासकामार्फत महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२१) * १८९९१ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील औदयोगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांची तसेच कासारवाडी, दापोडीसह खडकीतील रस्त्यांचीही दुरवस्था झाली असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला ड्रेनेज लाईन, केबल आणि भूमिगत वाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्ते पूर्ववत केले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याची दुरवस्था, जागोजागी पडलेले खड्डे यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून याबाबत शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याच्या दुरवस्थेस जबाबदार असणाऱ्या संबंधित ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये प्रभाग क्र.२० कासारवाडी व प्रभाग क्र.३० मध्ये दापोडी भाग समाविष्ट आहे. या प्रभागामध्ये कासारवाडी पूर्वेकडील भाग व संत तुकाराम नगर व दापोडी, फुगेवाडी व कासारवाडी पश्चिम भागातील सर्व रस्ते सुस्थितीत आहेत.

या रस्त्यांच्या व्यतिरिक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत काही रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

पाणीपुरवठा, ड्रेनेज, एम.एस.ई.बी. व एम.एन.जी.एल. इ. विभागामार्फत पडणारे खड्डे महानगरपालिकेमार्फत तातडीने दुरूस्त करण्यात येत आहेत. नागरिकांसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या उपाययोजना करण्यात आल्या असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार शहर महानगरपालिकेंतर्गत घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबविण्याबाबत

**(२२) * १९४९८ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबविला जात नसल्याने महानगरपालिकेविरोधात केंद्रीय हरित लवादाने रुपये १७० कोटींचा दंड आकारला असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हरित लवादाच्या निर्देशानुसार त्रिसदस्य समितीच्या पाहणीत १ लाख २१ हजार टन इतका कचरा प्रक्रिया न करता क्षेपणभूमीवर जमा झाल्याचे तसेच शहरातील सात ते आठ ठिकाणांची पाहणी करून तेथील पाण्याच्या नमुन्यांची प्रयोगशाळेत चाचणी केली असता समुद्र व खाडीचे पाणी प्रदूषित होत असल्याची नोंद समितीने आपल्या अहवालात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांडपाण्यावर प्रक्रिया न करता हे पाणी समुद्रात सोडण्यात येत असल्याने अरबी समुद्र, वसई व वैतरणा खाडी प्रदूषित होत असल्यामुळे हरित लवादाने वसई-विरार शहर महानगरपालिकेस रुपये ११३.५८ कोटी इतका दंड आकारुन सद्य:स्थितीत त्यामध्ये वाढ करुन रुपये १७० कोटींचा दंड वसूल करण्याच्या सूचना हरित लवादाने महानगरपालिकेला दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वसई - विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने यापूर्वी दिनांक २८/०१/२०२२ च्या आदेशान्वये आकारलेल्या दंडाच्या रक्कमेऐवजी आजपर्यंत होणाऱ्या दंडाची परिगणना करुन सुधारीत दंड आकारण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने दिनांक ०३/०५/२०२३ रोजी निर्गमित केले आहेत.

मात्र उक्त निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सुधारीत दंड आकारण्याचे आदेश अद्यापपर्यंत महानगरपालिकेस प्राप्त झाले नाहीत.
(२) व (३) राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्देशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल पुढील कार्यवाहीस्तव लवादाकडे सादर करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी राष्ट्रीय हरित लवादाच्या दिनांक १२/०७/२०२१ च्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक विभाग, ठाणे यांनी रुपये ११३.५८ कोटीचा दंड आकारण्यात आल्याचे वसई - विरार शहर महानगरपालिकेस कळविले आहे. तथापि, वाढीव दंड आकारण्याबाबत आदेशाची प्रत महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.
(४) वसई - विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेच्या क्षेपणभूमीवरील कचऱ्यावर आणि दैनंदिन निर्माण होणाऱ्या अंदाजे ६०० टन कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली.

स्वच्छ भारत-२ अभियानाअंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या रकमेपैकी महानगरपालिकेस रुपये ४.६९ कोटी एवढा निधी प्राप्त झाला आहे. उपरोक्त निधी व महानगरपालिकेच्या हिश्शातून क्षेपणभूमीवरील कचरा विल्हेवाट लावण्याकरिता रुपये ८२.५० कोटीचा प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे. तसेच दैनंदिन कचरा विल्हेवाटीकरिता महानगरपालिकेने रुपये १७८ कोटीच्या प्रकल्पाअंतर्गत ई-निविदा प्रक्रिया पार पाडली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच मलनिस्सारण प्रयोजनांतर्गत महानगरपालिका क्षेत्रात ३ ठिकाणी मलनिस्सारण प्रकल्प उभारणे प्रस्तावित असून यापैकी १०३ द.ल.लि. क्षमतेच्या नालासोपारा पुर्व आचोळे येथील STP Zone ३ रक्कम रुपये ४३१.२८ कोटी प्रकल्पास शासनाने मंजुरी प्रदान केली असून महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील अल्पसंख्यांक शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय सुरु करणेबाबत

**(२३) * २०१३० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील अल्पसंख्यांक शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे बांधकामास सन २०१८ मध्ये सुरुवात करण्यात आली असून इमारतीच्या काही भागाच्या बांधकामासाठी व परिसरातील नागरिकांसाठी रस्ता यासाठी जागा उपलब्ध नसल्याने बांधकामाचा वेग मंदावला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच शासकीय अधिकाऱ्यांद्वारे भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण केल्यामुळे सद्य:स्थितीत महाविद्यालयाचे काम पुर्णत्वास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुक्ताईनगर येथील अल्पसंख्यांक शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात सुरु करुन चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.
(२) भुसंपादन प्रक्रीया पूर्ण झाली नसल्याने सदर संस्थेच्या इमारतीचे बांधकाम अपूर्ण आहे.
(३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार प्रथम वर्षासाठी इमारतींचे बांधकाम परिपूर्ण अवस्थेत असणे आवश्यक आहे. सदर संस्थेच्या इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याने, चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रीया सुरु करणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नौपाडा, कुर्ला (पश्चिम) येथील सार्वजनिक शौचालयाच्या जागेत अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२४) * २०२९४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एल विभागातील नौपाडा कुर्ला (पश्चिम) येथील साधू मेडीकल जवळ हाऊस नंबर -११ सिटी सर्वे नं. ५९६ प्लॉट एरिआ ८६२ चौ.मी. ही जागा सार्वजनिक शौचालयासाठी आरक्षित असतानाही या जागेवर तळ + दोन मजली बांधकाम परवाना व भोगवटा प्रमाणपत्र न घेता महानगरपालिकेतील अधिकारी

यांच्या संगनमताने अनधिकृतरित्या बांधकाम करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकामाबाबत संबधितांकडून तक्रार करण्यात आली असता झोपडपट्टी दादांनी तक्रारदारांना जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार पोलीस स्टेशन, वर्तक नगर ठाणे शहर येथे दिनांक १३ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात पोलिसांकडून कोणतीही कारवाई झाली नसल्यामुळे संबंधित तक्रारदारांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदन दिले आहे तसेच यासंदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित करूनही त्यावर कोणतीही कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबत तसेच तक्रारदारांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या संबंधित झोपडपट्टी दादावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) विकास नियोजन नियमावली १९९१ व विकास नियोजन व प्रोत्साहन नियमावली २०३४ नुसार न.भू.क्र. ५९६, ५९६/१ ते ४१ कुर्ला-२ या भुखंडावर कोणतेही आरक्षण नसून सदर भूखंड रहिवासी क्षेत्रात मोडतो.

महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणाचे स्थळनिरिक्षण करण्यात आले. सदर ठिकाणी तळमजला + एक मजला + टॅरेस अशा स्वरुपाचे ४० फूट X १५ फूट आकारमानाचे जुने बांधकाम आढळून आले. परंतु, सदर बांधकाम सुरु असल्याचे अथवा नजिकच्या काळात झाल्याचे आढळून आले नाही. सदर बांधकामाचे प्रथम करनिर्धारण दिनांक ०१/०४/१९६३ रोजी झाल्याचे महानगरपालिकेला अभिलेखावरुन दिसून आले आहे.

नौपाडा हा गावठाण परिसर असून सदर भूखंडाच्या आजूबाजूला तळमजला + एक मजला अशा स्वरुपाची अनेक बांधकामे अस्तित्वात आहेत.

(२), (३) व (४) तक्रारदार हा वर्तकनगर पोलीस स्टेशन हद्दीत राहणारा असून तक्रारदार यांना विरोधकाने धमकी दिल्याबाबत वर्तकनगर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १३/०३/२०२२ रोजी पब्लीक एन.सी.क्र. ४७६/२०२२ भादवि क्र. ५०७ अन्वये अदखलपात्र तक्रार नोंदविण्यात आली आहे.

सदर तक्रार अदखलपात्र स्वरुपाची असल्याने तसेच तक्रारदाराला विरोधकांविरुध्द मा.न्यायालयातून दाद मागून घेणेबाबत सीआरपीसी १५५ नुसार लेखी समज देण्यात आली असल्याने पोलीसांमार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

विकास नियोजन नियमावली १९९१ व विकास नियोजन व प्रोत्साहन नियमावली २०३४ नुसार न.भू.क्र. ५९६, ५९६/१ ते ४१ कुर्ला-२ या भूखंडावर कोणतेही आरक्षण नसून सदर भूखंड रहिवासी क्षेत्रात मोडतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## नवी मुंबई येथील वाशी परिसरात महाराष्ट्र भवन उभारण्याबाबत

**(२५) * २०३७४ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ९७८० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्य राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्र भवन उभारण्यात यावे, अशी राज्यातील जनतेची व मा.लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील वाशी येथील सेक्टर ३० येथील आठ हजार चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर शहर व औद्योगिक गुंतवणूक विकास महामंडळ (सिडको) मार्फत महाराष्ट्र भवन उभारण्यात यावे, असे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास सिडको प्रशासनाचे मा.व्यवस्थापकीय संचालक यांना दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंडासाठी मागील शासनाने १०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केलेली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर महाराष्ट्र भवन उभारण्याप्रकरणी सिडको प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्याचे अतिथी गृह तथा महाराष्ट्र भवन यासाठी नवी मुंबई, वाशी येथील सेक्टर ३०-अ येथील भूखंड क्र. ११ ते १४ एकत्रित करुन एकूण ८३२२.९९ चौ.मी.चा भूखंड वितरीत करण्यास सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१२३१४, दिनांक ०३/०३/२०२० अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.त्यानुसार सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक ०५/०३/२०२० रोजी सदर भूखंडाचे वाटपपत्र देण्यात आले आहे.

तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी दिनांक ११/०३/२०२२ रोजीच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी रुपये १०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत घोषणा केली होती.

तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ०४/०३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ३१५०.५६/- लक्ष इतक्या रकमेस भूखंडाची भाडेपट्टा रक्कम तथा इतर अनुषंगिक बाबींसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. भूखंडाच्या वाटपपत्रानुसार भूखंडाचे शुल्क, जीएसटी, ६० वर्षांचे लिज रेंट, वॉटर डिस्ट्रीब्युशन बेटरमेंट चार्जेस, पॉवर सप्लायनेटवर्क डेव्हलपमेंट चार्जेस इ. एकूण देय रक्कमेपैकी रुपये ३४.३८ कोटी इतकी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सिडको महामंडळाकडे जमा करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त इतर संकिर्ण रकमेचा भरणा प्रलंबित असल्याने सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर भूखंडाचा करारनामा करण्याचे सिडकोमार्फत प्रस्तावित आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या दिनांक ०१/०६/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र भवनाचे संकल्पीत चित्रावर पुर्नविचार करुन नव्याने भव्य असे महाराष्ट्र भवन पूर्ण करण्याबाबात सिडकोस निर्देश देण्यात आले असून त्यानुसार सिडकोमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शीव (मुंबई) येथील टिळक रुग्णालयातील स्वच्छतेकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२६) * २०३९० श्री.राजहंस सिंह, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील के. ई. एम. रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन बंद अवस्थेत असल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, तसेच शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयातील इमारतीच्या झालेल्या दुरावस्थेमुळे रुग्णांसह डॉक्टरांना त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०२३ वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार रुग्णालयाच्या स्वच्छतेसाठी कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आल्याने ही समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, के. ई. एम. रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन तातडीने सुरु करण्यासह रुग्णांची गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्याने, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) परळ येथील के.ई.एम. रुग्णालयातील क्ष-किरण विभागातील सीटी स्कॅन मशीन काही तांत्रिक बिघाडामुळे बंद होते. त्यावेळी रुग्णांना सी.टी. स्कॅनकरिता महानगरपालिकेच्या सायन व नायर रुग्णालयात पाठविण्यात येत होते.

शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात स्वच्छतेच्या कामाकरिता ब्रिस्क इंडिया प्रा. लि. या संस्थेची दिनांक १३/१२/२०२२ ते दिनांक १२/१२/२०२५ या कालावधीकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. तथापि, सुरुवातीपासूनच सदर संस्थेने पुरेशा प्रमाणात कर्मचारीवर्ग व त्यांना स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात आवश्यक असणारी साधनसामग्री पुरविली नाही. त्यामुळे सदर ठिकाणी अस्वच्छता होत होती हे खरे आहे.

(३) के.ई.एम. रुग्णालयातील क्ष-किरण विभागातील बंद असलेले सीटी स्कॅन मशीन दुरुस्त करण्यात आले असून ते सद्य:स्थितीत कार्यरत आहे व सदर मशीनद्वारे दररोज १२० रुग्णांचे सीटी स्कॅन केले जात आहे. तसेच सदर रुग्णालयातील रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, १ नवीन सीटी स्कॅन मशीनसाठी कार्यादेश देण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार रुग्णांचे सीटी स्कॅन महानगरपालिकेच्या दराने करण्याकरिता नजीकच्या जेरबाई वाडिया रुग्णालयाशी टाय-अप करण्यात आले असून, के.ई.एम. रुग्णालयातील रुग्ण आवश्यकतेनुसार सीटी स्कॅन चाचणीसाठी वाडिया रुग्णालयात पाठविण्यात येतात.

लोकमान्य टिळक रुग्णालयातील दैनंदिन स्वच्छतेची पाहणी करण्याकरीता वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक कार्यरत असून, त्यांचेमार्फत रुग्णालयीन कर्मचाऱ्यांची मदत घेऊन साफसफाईचे काम करण्यात येते.

तसेच अपुरी कर्मचारी संख्या, स्वच्छतेसाठी आवश्यक असणारी साधनसामग्री न पुरविणे या कारणांसाठी वेळोवेळी सदर संस्थेच्या पर्यवेक्षकास प्रत्यक्ष समज देण्यात आली असून, त्यानंतरही पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध न केल्याने व कामात सुधारणा न आढळल्याने निविदेतील अटी व शर्तींनसुसार सदर संस्थेस रुपये ११.९३ लाख इतका दंड आकारण्यात आला आहे. यानंतरही कामाचा दर्जा व कर्मचाऱ्यांची

संख्या यामध्ये सुधारणा न झाल्यास निविदेतील अटी व शर्तींनुसार सदर संस्थेविरुध्द नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी सांस्कृतिक कार्यकमांचे आयोजन करण्यात येत नसल्याबाबत

**(२७)** * **२०५८५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्ष सुरु असून त्यानिमित्त मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी शासनाने ७५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली असूनही दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी नव्याने गठित करण्यात आलेल्या समितीकडून सदर कार्यक्रमाबाबत अद्याप कोणतेही नियोजन करण्यात आले नसल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्याच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये स्वातंत्र्यसैनिकांचे हौतात्म्य व संघर्षाची माहिती जनतेला कळण्याच्या दृष्टीने कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही. हे खरे नाही.

मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन व रुपरेषा निश्चित करण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ अन्वये मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना केली आहे. सदर मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ५/१२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मराठवाडा अमृत महोत्सवी वर्षात आयोजित करावयाच्या कार्यक्रमांच्या आराखड्याची शिफारस केली होती. तथापि, मा.मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर आराखडा सुधारित करण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय, दिनांक २० एप्रिल, २०२३ अन्वये निर्गमित केल्या होत्या. मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ८ जून, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत मराठवाडा अमृत महोत्सवी वर्षात मराठवाडा विभागात आयोजित करावयाच्या विविध कार्यक्रमांसाठी एकूण रुपये १०४.०० कोटी खर्चाच्या आराखड्याची शिफारस केली होती. शासन निर्णय, दिनांक ७ जुलै, २०२३ अन्वये, मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद व बीड या आठ जिल्ह्यांमध्ये सांस्कृतिक व ऐतिहासिक स्वरुपाचे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी रुपये ५०.०० लक्ष प्रमाणे एकूण रुपये ४.०० कोटी खर्चाच्या आराखड्यास मंजूरी दिली आहे. सदर खर्चाव्यतिरिक्त उपरोक्त कार्यक्रमासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी रुपये २.००कोटी पर्यंतचा खर्च जिल्हा वार्षिक नियोजन समितीतून करण्यास मंजूरी दिली आहे. तसेच औरंगाबाद येथे भव्य स्मृतिस्मारक उभारण्यास व त्यासाठी होणाऱ्या रुपये १०० कोटी खर्चास मंजूरी दिली आहे.
(२) मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद व बीड या आठ जिल्ह्यांमध्ये सांस्कृतिक व

ऐतिहासिक स्वरुपाचे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामाबाबत सर्वसामान्य जनतेस प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे यासाठी औरंगाबाद शहराच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाच्या समोर, विश्वास नगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद येथे भव्य स्मृतिस्मारक उभारण्यास व त्यासाठी होणाऱ्या रुपये १०० कोटी खर्चास मंजूरी दिली आहे. स्मृती स्मारकामध्ये स्मृतीस्तंभ, ऑडीटोरीयम हॉल, कला दालन, चित्र प्रदर्शनी दालन, बैठक सभागृह, मराठवाडा स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्म्यांचे पुतळे, मराठवाड्याची इतिहास प्रदर्शनी इत्यादी विविध बाबींचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परिक्षा, २०१९ मधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आरक्षणातून शिफारस प्राप्त उमेदवारांच्या नियुक्तीबाबत

**(२८)** * **२०५९० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थापत्य अभियांत्रिकी सेवा सन २०१९ या परीक्षेसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आरक्षणातून शिफारस प्राप्त ९४ उमेदवारांची नियुक्ती गेल्या ३ वर्षांपासून प्रलंबित असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे शासनाने अंतिम निर्णय प्रतीक्षेत ठेवला असून सदर न्यायप्रविष्ट बाबीमुळे अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २०२० मधील २१७ उमेदवारांची नियुक्तीही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर उमेदवार ३ वर्षे नियुक्तीच्या प्रतिक्षेत असल्यामुळे त्यांचे होत असलेले आर्थिक व मानसिक खच्चीकरण व नैराश्य पाहता मदतीच्या दृष्टिकोनातून शासनाने यासंदर्भात निर्णय घेऊन उमेदवारांची नियुक्ती लवकरात लवकर करण्यात यावी अशी मागणी मा.लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थापत्य अभियांत्रिकी सेवा सन २०१९ या परीक्षेसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आरक्षणातून शिफारस प्राप्त ९४ उमेदवारांची तसेच अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २०२० मधील २१७ उमेदवारांची जलदगतीने नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हो हे खरे आहे.

सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, कर सहायक व वन सेवेतील काही उमेदवारांनी दाखल केलेला मूळ अर्जावर मॅट, मुंबई यांनी दिनांक ०२/०२/२०२३ रोजी निकाल दिला आहे. सदर निकालान्वये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी एसईबीसी संवर्गातील उमेदवारांना ईडब्लूएस संवर्गात समाविष्ट करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३/१२/२०२० रद्दबातल ठरविला आहे. सदर शासन निर्णयान्वये, एसईबीसी कायदा रद्द झाल्यामुळे, या प्रवर्गातील उमेदवारांना पूर्वलक्षी प्रभावाने ईडब्लूएस प्रवर्गात सामावून घेण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. आता सदर आदेश न्यायाधिकरणाने रद्द ठरविल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत व अन्य प्राधिकरणामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षासंदर्भात अडचणी निर्माण होणार आहेत व त्याचे दुरगामी

परिणाम पदभरतीमध्ये होणार आहेत. या सर्व बाबी विचारात घेता महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या दिनांक ०२/०२/२०२३ रोजी दिलेल्या निकालाविरुध्द मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी अन्य रिट याचिका मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झाल्या असून शासनाची भूमिका महाधिवक्ता महाराष्ट्र राज्य तसेच अन्य विशेष अभियोक्ता (Special Counsel) यांच्याकडून मांडली जात आहे. उक्त याचिका न्यायप्रविष्ट असून सदर प्रकरणी मा.न्यायालयाकडून अंतिम निर्णय होईपर्यंत राज्य शासनाने याविषयी धोरण ठरविणे संयुक्तिक ठरणार नाही. तसेच या प्रकरणी प्रतिक्षा करणे उचित होईल असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील खटाव, मायणीसह अन्य भागांतील रिक्षा व वाहनचालक गॅस किटचा चुकीच्या पध्दतीने वापर करीत असल्याबाबत

**(२९) * १९९६३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव, मायणी (जि.सातारा) व अन्य भागांतील रिक्षा तसेच इतर वाहनचालक वाहनांकरिता असलेल्या एलपीजी गॅसचे किटमध्ये घरगुती गॅस भरून वाहन चालवित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेट्रोल वाहनांमध्ये कंपनीचे गॅस किट असणे आवश्यक असताना वाहनचालक विशेषत: रिक्षांसारखे प्रवासी वाहने चालविणारे वाहनचालक बाजारातील कोणतेही साधे किट खरेदी करून त्यामध्ये घरगुती गॅसचा भरणा करून वाहन चालवित असल्याने व घरगुती गॅसच्या काळाबाजारातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहनचालकांच्या अशा चुकीच्या कृतीमुळे वाहनांच्या इंजिनमध्ये केव्हाही बिघाड होवून एखादा अनुचित प्रकार घडून जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण होण्याची शक्यता विचारात घेता सदरहू प्रकरणी उप प्रादेशिक परिवहन विभागाकडून कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सातारा जिल्ह्यातील गॅस किटचा वापर करणाऱ्या प्रवासी तसेच अन्य वाहनांची तपासणी करून चुकीच्या पध्दतीने गॅस किटचा वापर करून प्रवासी नागरिकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या संबंधित वाहनचालकांवर व घरगुती गॅसचा काळाबाजार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) दिनांक ०६/०४/२०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(३) वाहनामध्ये घरगुती सिलेंडर मधील गॅसचा वापर करताना आढळणाऱ्या वाहनधारकांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत कारवाई करावी लागते.

वाहनामध्ये असलेले LPG / CNG गॅस किट हे नियमानुसार आहे किंवा नाही याची खातरजमा वाहन तपासणी दरम्यान केली जाते.

(४) सातारा जिल्ह्यातील कराड शहर पोलीस ठाणे हद्दीत एलपीजी गॅसच्या किटमध्ये घरगुती गॅस भरत असल्याची बाब माहे फेब्रुवारी मध्ये निदर्शनास आल्याने कराड शहर पोलीस ठाणे गु.र.नं.१९५/२०२३

भा.द.वि.स.क.२८५, २८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सध्या सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३०) * १८८८३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, ॲड.अनिल परब, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सौंदर्यीकरणासाठी महानगरपालिका आणि एमएमआरडीएने रुपये १३०० कोटी खर्च करूनही मिठी नदीचे सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याव्यतिरिक्त आणखी रुपये १ हजार कोटी विविध कामांसाठी खर्च केले जाणार असून या दोन्ही प्राधिकरणांनी मिठी नदीसाठी बहुतांश कामे केली असली तरी प्रत्यक्षात मात्र मिठी नदी प्रदूषण मुक्त झाली नसून त्यामुळे येणाऱ्या पुरापासून मुंबईकरांचे संरक्षण करण्यात अपयश आले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिठी नदीचा ११.८४ किलोमीटर लांबीचा भाग मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित तर ६ किलोमीटर लांबीचा भाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारित असून मिठी नदीच्या सुशोभीकरणासह प्रदूषण कमी करण्यासाठी नदीपात्रातील गाळ काढण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियमांचे उल्लंघन करत एकाच कंत्राटदाराला चारही कामे दिल्याचा ठपका कॅगने दिलेल्या अहवालात ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नियोजित केलेली चार विविध कामे एकाच कंत्राटदाराला देण्यामागील कारणे काय, मिठी नदीच्या सुशोभीकरणाचे तसेच गाळ काढण्यासाठी दिलेली विविध चार कामे एकाच कंत्राटदाराला देणाऱ्या दोषी अधिकारी तथा कर्मचाऱ्यांविरोधात चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहराला पावसाळ्यात पुरापासून वाचविण्यासाठी मिठी नदीच्या पुनर्जीवितेचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीचे टप्पा १ व २ अंतर्गत प्रस्तावित असलेले खोलीकरण, रुंदीकरण, संरक्षक भिंत आणि सेवा रस्ता बांधण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रुपये ६२१.८८ कोटी खर्च करण्यात आले असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रुपये ५३८.४० कोटी खर्च करण्यात आले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पामध्ये सौंदर्यीकरणाचे काम अंर्तभूत करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, पावसाळ्यादरम्यान मिठी नदीतील उद्भवणारी पूर सदृश्य स्थिती नियंत्रित ठेवण्यासाठी नदीची धारण वहन क्षमता वाढविणे, नदीतील प्रवाह बारमाही वाहते करणे, नदीची जैवविविधतेचे संवर्धन करणे, इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाचा

व्यवहार्यता अहवाल आणि विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सल्लागारामार्फत व्यवहार्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी नदीतील प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये सल्लागार मे. फ्रिशमन प्रभू यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सल्लागाराने सादर केलेल्या तांत्रिक व व्यवहार्यता अहवालानुसार लघु व दीर्घ मुदतीच्या उपाययोजनांतर्गत कामे सुचविली आहेत.

सल्लागाराने सुचविलेल्या अल्प मुदतीच्या उपाययोजनांतर्गत, गट क्रमांक १ मध्ये, फिल्टरपाडा, पवई ते डब्ल्यू.एस.पी कंपाऊंड दरम्यान नदीमध्ये उत्सर्जीत होणारे सांडपाणी अडवून ते मिठी किनाऱ्यालगतच्या नियोजित मलनिःसारण वाहिन्यांद्वारे वाहून नेऊन डब्ल्यू.एस.पी कंपाऊंड येथे प्रस्तावित ८ द.ल.घ.ली. एवढ्या क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्रामध्ये प्रक्रीया करण्याचे प्रस्तावित केले होते. सदर कामासाठी कंत्राट खर्च रुपये १३३ कोटी इतका होता.सद्य:स्थितीत गट क्रमांक १ अंतर्गत असलेली कामे पूर्ण झाली असून सदर मलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित आहे.

गट क्रमांक २ अंतर्गत, मुख्यतः (भरती प्रवण क्षेत्र वगळता) छोट्या नाल्यामधून मिठी मध्ये उत्सर्जीत होणारे सांडपाणी अडवून मुख्य मलनिःसारण वाहिन्यांमध्ये वळविणे तसेच मिठी नदीचे उर्वरित रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्ता बांधणे, इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे. सदर कामासाठी कंत्राट खर्च रुपये ४१५ कोटी इतका आहे. सद्य:स्थितीत ४५% काम पूर्ण झालेले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.

गट क्रमांक ३ अंतर्गत, भरती प्रवण क्षेत्रातील मिठी नदी व वाकोला नदीत विविध पातमुखांद्वारे उत्सर्जीत होणारे सांडपाणी अडवून मुख्य मलनिःसारण वाहिन्यांमध्ये वळविणे तसेच मिठी नदी व वाकोला नदीचे उर्वरित रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्ता बांधणे, पातमुखांवर फ्लड गेट बांधणे, उदंचन पंप बांधणे, प्रॉमनेड बांधणे, इत्यादी कामांचा अतर्भाव आहे. सदर कामासाठी सुमारे रुपये १६७० कोटी इतका अंदाजित खर्च असून मसुदा निविदा तयार करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहे.

गट क्रमांक ४ अंतर्गत, मुख्यतः मरोळ-बापट नाला व सफेद पूल नाला या दोन पातमुखांद्वारे मिठी नदीमध्ये उत्सर्जीत होणारे सांडपाणी अडवून ते धारावी येथील सांडपाणी प्रकिया केंद्रापर्यंत बोगद्याद्वारे वळविण्याचे काम अंतर्भूत आहे. सदर कामासाठी कंत्राट खर्च रुपये ४३७ कोटी इतका आहे. सद्य:स्थितीत ४०% काम पूर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) कॅगच्या दिनांक २३/१२/२०२२ रोजीच्या अहवालात मिठी नदीच्या गाळ काढण्याच्या कामांचा उल्लेख नाही. परंतु, मिठी नदी पॅकेज-२ अंतर्गतच्या ४ कामांपैकी दोन कामे एकाच कंत्राटदाराला देण्यात आल्याचा उल्लेख आहे. सदर कामे कंत्राटदाराने निविदेच्या अटी व शर्तीस अधीन राहून स्पर्धेद्वारे व लघुत्तम देकारद्वारे मिळवली आहेत.

सन २०२३ व २०२४ या दोन वर्षाकरिता मिठी नदीतील गाळ काढण्याच्या एकूण ३ कामांसाठी ३ भिन्न कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आली असून सदर कामे प्रगतिपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# नागपूर विभागातील १६ प्रवाशांचा जीव वाचविणाऱ्या शिवशाही बस चालकाला निलंबित केल्याबाबत

**(३१) * १९७८२ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील अमरावती मार्गावर प्रवासी घेऊन धावलेल्या एम.एच. ०६ बी.डब्ल्यू. ०७८८ क्रमांकाच्या शिवशाही बसला भीषण आग लागली होती, या आगीचे प्रसंगावधान राखत १६ प्रवाशांचा जीव वाचवणाऱ्या बस चालकाला राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी निलंबित केल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दोषींना बाजूला ठेवून निर्दोष बस चालकाला शिक्षा केल्यामुळे अन्य कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बसची वायरिंग गरम होऊन इंजिन पेटल्याने बसला आग लागल्याची माहिती चौकशीत निदर्शनास आली असून याबाबतची जबाबदारी अधिकाऱ्यांची असतानाही निर्दोष बस चालकाला निलंबित करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बसचालकाला तात्काळ कामावर घेऊन झालेल्या चुकीबद्दल संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी लावून दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) दिनांक ४/०४/२०२३ रोजी स्वमालकीचे शिवशाही वाहन क्र. एमएच-०६ बीडब्ल्यू-०७८८ नागपूर- अमरावती मार्गावर धावत असताना सदर वाहनाच्या इंजिन जवळील वायरींग शॉर्ट सर्किट झाल्याने वाहनास आग लागल्याची घटना घडलेली आहे. सदर बस चालकाला इंजिनमध्ये दोष निदर्शनास आल्यानंतरही वाहन तात्काळ न थांबविता सदरचे वाहन चालविल्यामुळे, आग लागल्यानंतर बॅटरी मेन कट ऑफ स्विच बंद न केल्यामुळे व अग्नीशमन उपकरणाचा वापर न केल्यामुळे सदरची आग वेळीच आटोक्यात आली नाही त्याकरीता त्यांना जबाबदार धरून निलंबनाची कारवाई करण्यात आलेली होती व त्यानंतर आरोपपत्र देण्यात आलेले आहे. तथापि, सदर बस चालक यांचे निलंबन दिनांक २०/०४/२०२३ रोजी मागे घेण्यात आलेले आहे.

तसेच वाहनाच्या देखभालीमधील उणीवांबाबत गणेशपेठ आगाराचे प्रभारक, प्रमुख कारागीर, सहा. कारागीर (वीजतंत्री), सहा. कारागीर व सहाय्यक यांस जबाबदार धरून आरोपपत्र देण्यात आलेले आहे व कामगिरीवरील वाहक यांना आरोपपत्र देण्यात आलेले आहे.

----------------

## डोंबिवली-बदलापूर एकात्मिक बससेवा सुरू करण्याबाबत

**(३२) * २०४०२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली-बदलापूर एकात्मिक बससेवा सुरू करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने राज्य राज्य शासनाला प्रस्ताव पाठविला असून कल्याण, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, कुळगाव-बदलापूर, अंबरनाथ शहरांना जोडणारी एकात्मिक बससेवा सुरू झाल्यास प्रवाशांना फायदा होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील प्रवासी हिताचा हा महत्वपूर्ण विषय मार्गी लागण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या समवेत बैठक घेऊन प्रवाशांना तत्पर सेवा मिळण्यासाठी निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिसरात बस सेवा नसल्यामुळे नागरिकांना रिक्षानेच प्रवास करावा लागत असल्याने एकात्मिक बससेवा सुरू करण्याबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी प्रधान सचिव, नगर विकास,नवि-२ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३.०७.२०२३ रोजी बैठक घेण्यात आली असून, त्यामध्ये सर्व संबधीतांना याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## शासकीय सेवेत असताना निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देणेबाबत

**(३३) * १९७०१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेत असताना निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याचे धोरण असतानाही आठ हजार उमेदवार प्रतिक्षा यादीत असून, अनुकंपा नियुक्त्यांची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याने अनेक उमेदवार वयोमर्यादा ओलांडत असून प्रतिक्षा यादीतून त्यांची नावे काढण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांची संख्या लक्षात घेता सरळ सेवेच्या रिक्त होणाऱ्या पदांच्या दहा टक्के पदे ही मर्यादा आता वीस टक्के करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२२ डिसेंबर अखेरपर्यंत विविध विभागात अनुकंपा तत्वावरील नियुक्त्यांच्या प्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांची ७ हजार ९८८ एवढी संख्या असल्याची माहिती देण्यात आली असून त्यात ‘गट क’ मधील ४ हजार ८३८ व गट ड मधील ३ हजार १५० उमेदवारांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय सेवेत नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांना तातडीने अनुकंपा तत्वावर नियुक्त्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही /उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या गट-अ ते गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनुकंपा नियुक्तीसाठी पद उपलब्धतेनुसार प्रतिक्षासूचीवरील ज्येष्ठतेनुसार अनुकंपा नियुक्ती देण्यात येते.

अनुकंपा नियुक्ती योजनेनुसार प्रतिक्षासूचीवरील उमेदवारास वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती देण्यात येते.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडील सामायिक प्रतिक्षासूचीनुसार दिनांक ०१/०७/२०२३ रोजी एकूण ६,८०१ उमेदवार अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षासूचीवर आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत सरळसेवेतील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २० टक्के पदे अनुकंपा तत्त्वावर भरण्यात येत आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३०/०६/२०२३ या कालावधीत गट-क च्या ८३८ व गट-ड च्या ५३१ अशा एकूण १३६९ उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देण्यात आली आहे.

अनुकंपा प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांना जलदगतीने नियुक्ती देण्यासाठी सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात येवून जिल्ह्यातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडील अनुकंपा नियुक्तीचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अनुकंपा नियुक्ती जलदगतीने होण्यासाठी सामान्य प्रशासन विभागामार्फत संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये सीवुडस येथील 'द आर्चिड इंटरनॅशनल स्कूल' ही शाळा अनधिकृत असल्याबाबत

**(३४) * १९५२१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये सीवुडस (नवी मुंबई) येथील सेक्टर ४० मधील इंग्रजी माध्यमाची "द आर्चिड इंटरनॅशनल स्कुल" या शाळेचा नवी मुंबई महानगरपालिकेने जाहीर केलेल्या पाच अनधिकृत शाळांमध्ये समावेश असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा अनधिकृत असतानाही या संस्थेने सिडकोने दिलेल्या मैदानाचाही ताबा घेतला असून या मैदानावर कॉंक्रिटीकरण करुन फुटबॉल व इतर खेळाचे साहित्य बसविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत अनधिकृतपणे सुरु असलेल्या शाळा व संस्थाचालकांवर आरटीई अंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत 'द आर्चिड इंटरनॅशनल स्कुल' या शाळेच्या संचालकांना अनधिकृत शाळा बंद करणेबाबत नोटिस देण्यात आलेली आहे.

•सदर अनधिकृत शाळा बंद न केल्यामुळे संचालकांना दंडात्मक शास्तीचे आदेश देण्यात आले. त्यामध्ये दंडात्मक रक्कम भरून शाळा तात्काळ बंद करण्याबाबत आदेशित केले आहे.

• 'द आर्चिड इंटरनॅशनल स्कुल' या शाळेने दंडात्मक रक्कम रुपये ३,१०,०००/- भरलेली आहे. सदर शाळा बंद केल्याचे हमीपत्र महानगरपालिकेस सादर केलेले नाही.

•त्याअनुषंगाने सदर शाळेवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई- विरार शहर महानगरपालिकांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतनवाढ व इतर लाभ देण्याबाबत

**(३५) * २०३०७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात कंत्राटदारी पध्दतीवर कार्यरत असलेल्या सफाई कामगारांना राज्य शासनाने किमान वेतन कायद्यानुसार वेतनवाढ तसेच सुरक्षेसाठी सफाईची साधने, आरोग्याच्या सोयी-सुविधा देण्याबाबत 'समर्थन' संस्थेने मा.मुख्यमंत्री मा.प्रधान सचिव (नगरविकास विभाग), मा.आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका, यांच्याकडे पत्राद्वारे दिनांक १० मे, २०२३ वा त्यासुमारास विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने सफाई कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनात वाढ व इतर लाभ देण्याकरिता घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) वसई-विरार महानगरपालिकेने कळविल्यानुसार शहरातील ९ प्रभाग समित्यांमध्ये झोन निहाय कचरा संकलन, गटार सफाई, रस्त्यांची सफाई इ. कामांसाठीचा त्रैवार्षिक साफ-सफाईचा ठेका अभिकर्त्यांना देण्यात आला असून त्यांच्यामार्फत दैनंदिन साफ सफाईचे मासिक वेतन मंजूर दराप्रमाणे अदा करण्यात येते. त्यामध्ये किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार त्यांच्या बँक खात्यामध्ये कामगारांना प्रतिमाह रुपये २७,३७९/- इतके वेतन अदा करण्यात येते. त्याचबरोबर दर ६ महिन्यांनी महागाई निर्देशांकाप्रमाणे वेतनात वाढ दिली जाते. या व्यतिरिक्त पी.एफ., ई.एस.आय.सी., बोनस, एच.आर.ए. व गणवेश, रेनकोट, गमबुट इ. साहित्यांचे वाटप ठेकेदारामार्फत सफाई कामगारांना करण्यात येते.

तसेच दर सहा महिन्यांनी सदर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुळशीवाडी (मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातील रहिवासी धोकादायक संक्रमण शिबीर इमारतीत वास्तव्यास असल्याबाबत

**(३६)** * **१८९३२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळशीवाडी, मुंबई सेंट्रल येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात घरे गेलेले रहिवासी वास्तव्यास असलेल्या संक्रमण शिबीर इमारतीची अवस्था अत्यंत धोकादायक असल्याने रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याची बाब दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संक्रमण शिबिराची इमारत धोकादायक झाली असल्याने पावसाळ्यात कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची दाट शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पुनर्वसन प्रकल्पाची इमारत बांधून पूर्ण झाली असतानाही विकासकाने प्रकल्पग्रस्तांना अद्यापही घरे न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त संक्रमण शिबिराची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आणि सदरहू पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाश्यांना पुनर्वसन झालेल्या इमारतीत तातडीने स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) तुळशीवाडी, मुंबई सेन्ट्रल येथील एकत्रित पुनर्विकास नागरी नुतनीकरण योजनेकरिता बांधलेल्या २ संक्रमण शिबीराची दुरावस्था झाली आहे हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

अशा स्वरुपाची दुर्घटना घडून नये याकरीता संक्रमण शिबिराच्या इमारती रिक्त करुन निष्कासित करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत विकासक, वास्तुविशारद व तुळशीवाडी गृहनिर्माण संस्था यांना दिनांक ०९/०५/२०२३, १०/०५/२०२३, ०१/०६/२०२३ व १९/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३), (४) व (५) सदर एकत्रित पुनर्विकास नागरी नुतनीकरण योजनेमधील पुनर्वसनासाठीच्या ७ इमारतींना सन २०१२ ते २०१८ या दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विकासकाला दिलेल्या दिनांक ०७/०१/२०१७ रोजीच्या सुधारित इरादापत्र (एल.ओ.आय.) च्या अट क्रमांक १७ (ई) मध्ये, पुनर्वसन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर रहिवाशी सदनिका / अनिवासी गाळे यांच्या वाटपासाठी संस्थेने विनंती केल्यानंतर महानगरपालिकेमार्फत परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या रहिवाशांना रहिवाशी सदनिका / अनिवासी गाळयांचे वितरण लॉटरी पध्दतीने करण्याचे नमूद आहे.

उपरोक्त ७ इमारतींपैकी ६ इमारती व ७ व्या (ए-४) इमारतीची विंग-ए मधील सदनिकांसाठी लॉटरी पूर्ण झाली असून तेथे पात्र रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

परंतु, संस्थेने ७ व्या (ए-४) इमारतीमधील विंग-ब च्या लॉटरीकरिता अद्यापपर्यंत महानगरपालिकेकडे विनंती केलेली नाही.

-----------------

## अराजपत्रित गट-ब पुर्व परिक्षा-२०२० चा निकाल जाहीर करणेबाबत

**(३७) * १९६३३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन पोलीस उपनिरीक्षक व सहायक कक्ष अधिकारी पदासह राज्य कर निरीक्षक पदांच्या भरतीसाठी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये संयुक्त भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून सदर पोलीस उपनिरीक्षक पदासाठीच्या परीक्षा होऊन ३ वर्षांच्या कालावधीनंतरही सदर परिक्षेचा अंतिम निकाल अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे गेल्या ३ वर्षांपासून प्रश्न भाग-१ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची भरती प्रक्रिया वेळेत न राबविल्यामुळे यातील अनेक विद्यार्थ्यांचे वय उलटून गेल्यामुळे त्यांचे भविष्य अंधकारमय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सन २०२० मध्ये घेण्यात आलेल्या पोलीस उप निरीक्षक व सहायक कक्ष अधिकारी पदासह राज्य कर निरीक्षक पदांचा निकाल जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पोलीस उपनिरीक्षक, सहायक कक्ष अधिकारी व राज्य कर निरीक्षक या सवर्गांच्या पद भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा-२०२० मधील पूर्व परीक्षेच्या उत्तरतालिकेसंबंधित उद्भवलेली न्यायिक प्रकरणे व त्यावरील मा.न्यायालयाचे/ न्यायाधिकरणाचे आदेश यामुळे जानेवारी, फेब्रुवारी, २०२२ या नियोजित कालावधीत मुख्य परीक्षेचे आयोजन करणे शक्य झाले नाही. त्या अनुषंगाने मुख्य परीक्षेबाबत पुढील कार्यवाही करुन सहायक कक्ष अधिकारी या संवर्गाचा निकाल दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ व राज्य कर निरीक्षक या संवर्गाचा अंतिम निकाल दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे. तसेच पोलीस उपनिरीक्षक पदाकरिता मुख्य परीक्षा, शारिरीक तपासणी, मुलाखतीबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात आली. तथापि, या पदाच्या जाहिरातीतील सामाजिक शैक्षणिक मागास प्रवर्ग (SEBC) प्रवर्गातील आरक्षणाच्या अनुषगांने उद्भवलेल्या न्यायप्रविष्ट प्रकरणामुळे सद्य:स्थितीत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यु.एस.) प्रवर्गासाठी राखीव असलेल्या ६५ पदांचा निकाल राखीव ठेऊन तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील जवाहरलाल दर्डा विमानतळासह लातूर, नांदेड, उस्मानाबाद व बारामती येथील सर्व विमानतळे एमआयडीसीच्या ताब्यात देण्याबाबत

**(३८) * २०६६८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने आधुनिकीकरण आणि विस्ताराच्या अपेक्षेने यवतमाळच्या जवाहरलाल दर्डा विमानतळासह लातूर, नांदेड, उस्मानाबाद व बारामती ही विमानतळे केवळ रुपये ६३ कोटींच्या बोलीवर

रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपमेंटकडे सुपूर्द केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिलायन्सने गत १४ वर्षांत सदरहू विमानतळांकडे दुर्लक्ष केले असल्याने या विमानतळांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विमानतळांची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि सदरहू विमानतळे रिलायन्सकडून काढून घेऊन एमआयडीसीकडे सुपूर्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर विमानतळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) अखत्यारीत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सदर विमानतळे रिलायन्स कंपनीला आधुनिकीकरण, विस्तारीकरण तसेच, देखभाल दुरूस्तीसाठी भाडेपट्टा करारनामा, अटी व शर्तीसह दिली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा. लि. यांचेकडून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (MADC) यांना जसे आहे तसे या तत्वावर (As is where is basis) व्यवस्थापन, परिचालन, देखभाल व दुरूस्ती करीता हस्तांतरीत करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अभिप्राय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागास कळविले आहेत. त्यानुषंगाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून आलेला प्रस्ताव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आला आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील प्रस्तावावर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून अभिप्राय प्राप्त झाल्यावर याबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## जामखेड (जि.अहमदनगर) येथील शासकीय वसतिगृहातील गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत

**(३९)** * **२०३७९ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामखेड (जि.अहमदनगर) येथील मुलांच्या शासकीय वसतिगृहातील अनागोंदी कारभार, गैरव्यवहार, चोऱ्या, मारामारी याबाबतचे तक्रार निवेदन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अहमदनगर यांना वेळोवेळी देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार अद्यापपर्यंत संबंधितांकडून कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जामखेड येथील वसतिगृहात होत असलेल्या गैरकारभाराबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रकरणी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या कार्यालयास दिनांक ६/०४/२०२३ रोजी निनावी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) व (३) सदर वसतिगृहात दिनांक १६/१२/२००६ रोजी संगणकाची चोरी झाली होती. सदर चोरीबाबत पोलीस स्टेशन, जामखेड येथे दिनांक १७/१२/२००६ रोजी गुन्हा (क्र.१३०/६ भा.दं.वि.क.३८०) दाखल करण्यात आला आहे. तथापि, पोलीस तपासामध्ये गुन्हा उघडकीस न आल्याने मा.न्यायालयाच्या आदेशानुसार तो कायमस्वरूपी तपासावर ठेवण्यात आलेला आहे. याव्यतिरिक्त वसतिगृहामध्ये अनागोंदी कारभार, गैरव्यवहार, चोऱ्या, मारामारी याबाबतचे कोणतेही अनुसूचित प्रकार घडून आले नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीमध्ये वाढ करण्याबाबत

**(४०) * २०१९४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत म्हणून एक लक्ष रुपये देण्याबाबतचा निर्णय सन २००६ मध्ये घेतला असून सन २००६ मधील रुपयांचे मूल्य व सन २०२३ मधील रुपयांचे मूल्य लक्षात घेता आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांसाठी देण्यात येणारी एक लक्ष रुपयांची मदत अत्यंत कमी असून याबाबत परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे सन २०२३ मध्ये (जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथील मुख्यमंत्री कक्ष) लेखी निवेदन सादर केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२३ मधील महागाई व रुपयांचे अवमूल्यन लक्षात घेता आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना दहा लक्ष रुपये याप्रमाणे आर्थिक मदत देण्याबाबत शासन स्तरावरून काय कारवाई करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) जिल्हा अधिकारी, परभणी यांच्या अहवालानुसार अशा स्वरूपाचे निवेदन जिल्हा अधिकारी कार्यालय, परभणी येथील मुख्यमंत्री कक्षात सादर केल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील पिंपळे गुरव येथे मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(४१) * १८९९२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपळे गुरव येथे केंद्र शासनाच्या वतीने स्मार्ट सिटी हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविला जात असूनही येथील काही भाग अदयापही सोयी-सुविधांपासून वंचित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपळे गुरव मधील काही भागात अंतर्गत रस्त्याचे, पिण्याचे पाणी व सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पिंपळे गुरव भागामध्ये पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. तसेच महानगरपालिकेमार्फत रस्ते, पाण्याचे पाणी व इतर सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. नागरिकांच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार सदर भागात सोयी सुविधा पुरवून नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येते.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मरीन ड्राईव्ह परिसरात अद्ययावत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४२) * १९४९२ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मरीन ड्राईव्ह परिसरात देश विदेशातून येणारे पर्यटक आणि मुंबईकर नागरिकांसाठी सुविधा, स्वच्छता, सुशोभीकरण आदी कामांचा आढावा घेणारा पाहणी दौरा मा.मुख्यमंत्री महोदयांनी नुकताच केला असल्याची बाब माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या कामाची आणि उपाययोजनांची माहिती महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मरीन ड्राईव्ह परिसरात एक व्हयुवींग डेक (सी साईट प्लाझा) नवीन तयार करण्यासोबतच सार्वजनिक प्रसाधनगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी पालिका प्रशासनाला दिले आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर पाहणीदरम्यान मरीन ड्राईव्ह परिसरात शौचालय सुविधा, बसण्यासाठी बेंचेस, चांगली प्रकाश योजना, इत्यादी सुविधा देण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनास दिल्या होत्या.
(४) मरीन ड्राईव्ह परिसरात सौंदर्यीकरणाच्या कामाकरिता वास्तुविशारदांकडून आरेखन व संकल्पना मागविण्यात आल्या असून पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत : मुंबई, पुणे, नागपूरसह चंद्रपूर येथील हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४३) * १८८९२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.राजहंस सिंह, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या निर्देशानुसार मुंबई, पुणे, नागपूर व चंद्रपूर शहरातील हवेची गुणवत्ता ढासळली असून मुंबईतील उष्णतेच्या लाटा, हवेचे प्रदूषण व धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या कृती आराखड्याची अंमलबजावणी केली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्याबरोबरच रोजचे निरीक्षण नोंदविण्यासाठी शहरात महाल मधील टाऊन हॉल, व्हीएनआयटी आणि एलआयटी अशा तीन ठिकाणी हवा नियंत्रण केंद्रे उभारण्यात आली असून केंद्र शासनाच्या हवा गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत शासनाकडून पहिल्या टप्प्याकरीता राज्याला रुपये ६४.६ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ ते २०२२ या कालावधीत वायू प्रदूषण एकूण २३७ टक्क्यांनी वाढले असून घनकचरा व्यवस्थापनाच्या तक्रारींमध्ये १२४ टक्क्यांनी वाढ झाली असून सन २०२२ मध्ये राबविण्यात आलेल्या स्वच्छ भारत अभियानात कचरा मुक्त शहर स्पर्धेत बृहन्मुंबई महानगरपालिकेस पंचतारांकित मुल्यांकन मिळाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मल:निसारण संबंधीच्या तक्रारींमध्ये ३५ टक्के वाढ सन २०१३ ते २०२२ या कालावधीत झाली असून महानगरपालिकेच्या यंत्रणेने संबंधित तक्रारी सोडविण्यासाठी ३१ दिवसांचा कालावधी असल्याचे निदर्शनास आले असून शहरातील डपिंग ग्राउंडवर नेल्या जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्याचा महानगरपालिकेचा उद्देशही सफल झालेला नसून सन २०२० व २०२२ मध्ये यात १० टक्क्यांनी वाढ झाल्याचा निष्कर्ष प्रजा फाउंडेशनने प्रसिध्द केलेल्या अहवालातूनच समोर आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर हवा गुणवत्ता नियंत्रण केंद्रांच्या सर्वेक्षणानुसार नागपूर येथील हवेच्या गुणवत्तेची सद्य:स्थिती काय आहे तसेच चंद्रपूर व मुंबई मधील प्रदूषण कमी करण्यासाठीच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत मुंबई, पुणे, नागपूर, चंद्रपूर शहरासहीत राज्यातील १८ शहरांची हवा गुणवत्ता सुधारण्याकरिता कृती आराखडा तयार करण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्य स्तरीय हवा गुणवत्ता संनियंत्रण (Air Quality Monitoring) बाबतची सरासरी २०१६ ते २०२२ पर्यंत नागपूर-११०, चंद्रपूर-१०७, मुंबई १३१ व पुणे १०१ अशी आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या अहवालानूसार हे खरे नाही. तथापि, मागिल दहा वर्षाच्या तुलनेत सध्या वायू प्रदुषणात वाढ झाल्याचे दिसून येते.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या अहवालानूसार शहरातील डंपिंग ग्राऊंडवर नेल्या जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्याचा महानगरपालिकेचा उद्देशही सफल झालेला नाही, ही बाब खरी नाही.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नागपूर शहरामध्ये टाऊन हॉल महाल, व्हिएनआयटी, एलआयटी तसेच डीव्हिजनल कमिशनर ऑफीस या ठिकाणी स्वयंचलीत हवा गुणवत्ता केंद्र बसविलेले असून हवेची गुणवत्ता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर दर्शविण्यात येते. जून,२०२३ ते आजतागायत हवेची गुणवत्ता साधारण व चांगली असल्याचे दिसून येते.

चंद्रपूर व मुंबईमधील प्रदूषण कमी करण्यासाठीच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी दोन्ही महानगरपालिकेंसोबत आढावा बैठका घेण्यात येतात व कृती आराखड्यानुसार पुढील कामे प्रगतीपथावर आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुंबई सेंट्रल व परळ बस स्थानकातील सर्व वाणिज्य आस्थापना व दुकाने बंद केल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत

**(४४) * २०६१८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुंबई सेंट्रलसह परळ बस स्थानकातील सर्व आस्थापना व दुकाने बंद करण्यात आल्याने प्रवाशांना उपाशी राहण्याची किंवा चहापाण्यासाठी आगाराबाहेर जावे लागण्याची वेळ आल्याने प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत,सर्व महिलांना प्रवासात निम्मे भाडे यामुळे एसटी प्रवासासाठी प्रवाशांची गर्दी वाढली असून प्रवाशांना दर्जेदार सुविधा देणे अपेक्षित असतानाही सध्याच्या सुविधा बंद झाल्याने प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई सेंट्रलसह परळ आणि इतर सर्व बसस्थानकांमध्ये प्रवाशांना पॅक बंद पाणी बाटली, साधे पाणी, पीसीओ आणि मोबाईल पीसीओ व नेटवर्क सुविधा, कॅन्टीन,औषध दुकाने, स्टेशनरी, पेपर स्टॉल, फ्रुट स्टॉल, एटीएम यांसह असणाऱ्या सर्व मूलभूत सेवा प्रवाशांना तातडीने देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

रा.प.मुंबई सेंट्रल बसस्थानकावर एटीएम सेवा केंद्र, नाथजल बाटली बंद पाणी, स्वयंचलित चहा-कॉफी व विविध वस्तू भांडार ह्या वाणिज्य आस्थापना कार्यरत आहेत परंतू उपहारगृह ही आस्थापना रिक्त आहे. तसेच रा.प.परळ बसस्थानकामध्ये काही आस्थापना रिक्त आहेत.

(३) व (४) रा.प.मुबई विभागातील सर्व आगारातील बसस्थानकावरील रिक्त वाणिज्य आस्थापनांसाठी दिनांक २६/०६/२०२३ रोजी निविदा प्रसारीत करण्यात आली आहे.

-----------------

## स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अखर्चित राहिलेला कोट्यवधींचा निधी मागासवर्गीयांच्या विकासकामांकरिता वापरण्याबाबत

**(४५) * १९७०३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीयांच्या विकास योजनांचा कोट्यवधींचा निधी अखर्चित राहिल्याचे निदर्शनास आले असून गत चार वर्षांपासून स्टॅन्ड अप इंडियासाठी अर्थसंकल्पात रुपये २२५ कोटींची तरतूद केली असताना प्रत्यक्षात रुपये १२.५२ कोटींचा खर्च झाला आहे तसेच मागासवर्गीय वस्ती सुविधांसाठी सन २०१९-२०२३ या कालावधीत रुपये २६२५ कोटी रुपयांची तरतूद केली असताना त्यापैकी प्रत्यक्षात रुपये १७०४ कोटींचा खर्च झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाने स्टँड अप इंडिया या योजनेंतर्गत मागासवर्गीय तरुणांना उद्योगासाठी प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९- २०२० मधील रुपये २५ कोटी तरतूदींपैकी एकही रुपयाचा खर्च केला नसून सन २०२०- २०२१ मध्ये रुपये २५ कोटींच्या तरतूदीपैकी रुपये ६.८३ कोटीचा खर्च, सन २०२१ - २०२२ मध्ये सदर तरतूद वाढवून रुपये ७५ कोटी केली असून त्यापैकी रुपये ५.६९ कोटींचा खर्च तसेच सन २०२२- २०२३ मध्ये रुपये १०० कोटीच्या तरतूदीपैकी सर्व निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बार्टीच्या विद्यार्थ्यांचे फेलोशीपसाठी आंदोलन सुरु असताना अनुसूचित जातीच्या तरुणांच्या शिष्यवृत्तीची तरतूद अखर्चित राहिल्याने या शिष्यवृत्तीसाठी सन २०१९- २०२० मधील रुपये ५० कोटी तरतूदीपैकी १८१ लाभार्थी तर सन २०२०- २०२१ मध्ये रुपये २४ कोटीची तरतूद असून त्यापैकी १३९ लाभार्थी, सन २०२१- २०२२ मध्ये रुपये १०० कोटी तरतूदीपैकी रुपये ५३ कोटी खर्च तसेच सन २०२२ - २०२३ मधील १५० कोटी तरतूदींपैकी रुपये ५५ कोटी खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागासवर्गीय वस्ती सुविधांबाबतच्या योजनेसाठी सन २०१९-२०२० या वर्षी रुपये ३०० कोटींची तरतूद, सन २०२०-२०२१ मध्ये रुपये १२५ कोटींची तरतूदीपैकी रुपये ४१ कोटी खर्च करण्यात आले व सन २०२०-२०२१ मध्ये रुपये १००० कोटींच्या तरतुदीपैकी रुपये ६५० कोटीचा खर्च तसेच सन २०२२-२०२३ मध्ये रुपये १२०० कोटींच्या तरतूदीपैकी रुपये ८४० कोटीचा खर्च झाला असून गत चार वर्षात एकूण तरतुदीच्या ७५ टक्के पर्यंत ही खर्च न झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मागासवर्गीयांचा कोट्यवधींचा सन २०१९ ते २०२३ या कालावधीतील विकास निधी अखर्चित

राहिल्यामुळे सदरहू निधी मागासवर्गीयांच्या विकासकामाकरिता वापरण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) अंशतः खरे आहे

स्टँड अप इंडिया योजनेसाठी गत ४ वर्षासाठी रुपये २२५ कोटी एवढी तरतूद असून प्रत्यक्षात रुपये १३.३८ कोटी एवढी तरतूद खर्च झालेली आहे. योजनेंतर्गत जितकी प्रकरणे प्राप्त झालीत त्या सर्व प्रकरणांना मंजूरी देण्यात आली आहे. तरतुदी अभावी प्रस्ताव प्रलंबित नाही.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या जिल्हा वार्षिक योजनेसाठी गत ४ वर्षासाठी ३३०७.४४ कोटी एवढी तरतूद असून ही सर्व तरतूद खर्च झालेली आहे.

अनुसूचित जातीच्या तरुणांच्या परदेशातील शिक्षणासाठी सन २०१९-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता शिष्यवृती योजनेसाठी रुपये २७७ कोटी एवढी तरतूद असून प्रत्यक्षात रुपये १६७ कोटी एवढी तरतूद खर्च झालेली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेसाठी गत ४ वर्षासाठी रुपये ३२०० कोटी एवढी तरतूद असून प्रत्यक्षात रुपये १७०४.७० कोटी एवढी तरतूद खर्च झालेली आहे.
(५) व (६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## वसई –विरार शहर महानगरपालिकेच्या मालकीची शाळा नसल्याबाबत

**(४६) * १९५४४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई –विरार शहर महानगरपालिकेची स्वतःच्या मालकीची एकही शाळा नसतानाही कोटयवधी रुपयांचा शैक्षणिक कर आकारत यावर्षी अर्थसंकल्पात शाळा सुरु करण्याची कोणतीही तरतूद महानगरपालिकेने केलेली नसल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई–विरार विकास आराखड्यात शाळेसाठी ६८ भूखंड राखीव असून शाळांकरीता राखीव असलेल्या भूखंडावर शाळा सुरु करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेच्या मालकीची एकही शाळा नसतानाही शैक्षणिक कर वसुल करण्यामागची कारणे काय, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शैक्षणिक कर आकारणाऱ्यांवर काय कार्यवाही केली आहेवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेमार्फत शासनाच्या निर्देशानुसार शिक्षण कर गोळा करुन शासनाकडे जमा करण्यात येत आहे. तथापि, महाराष्ट्र शिक्षण (उपकर) कायदा, १९६२ अन्वये मालमत्तेच्या करयोग्य मुल्यांच्या २ % कर महानगरपालिकेच्या माध्यमातून वसुल करुन शासनाकडे शिक्षण कर म्हणुन जमा करण्यात येतो.

तसेच सन २०२३ - २४ च्या अर्थसंकल्पात पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व्यवस्था संबंधित लेखाशिर्षात महानगरपालिकेमार्फत नाममात्र लाक्षणिक तरतुद करण्यात आली असल्याची बाब

वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी एकूण १५३ भूखंड आरक्षित आहेत. वसई-विरार शहर महानगरपालिकेद्वारे या क्षेत्रातील लोकसंख्या विचारात घेऊन शाळा सुरू करण्याबाबतचे निवेदन महानगरपालिकेच्या स्तरावर प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेमार्फत शासनाच्या निर्देशानुसार शिक्षण कर गोळा करुन शासनाकडे जमा करण्यात येत आहे. तथापि, महाराष्ट्र शिक्षण (उपकर) कायदा, १९६२ अन्वये मालमत्तेच्या करयोग्य मुल्याच्या २ % कर महानगरपालिकेच्या माध्यमातून वसुल करुन शासनाकडे शिक्षण कर म्हणुन जमा करण्यात येतो.

वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत शिक्षण करापोटी एकूण १६७.५१ कोटीची वसुली झालेली रक्कम शासनास अदा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मागाठाणे मेट्रो स्टेशन येथे सुरक्षा निकषांचे पालन न करता गृह प्रकल्पासाठी खोदकाम करणाऱ्या विकासकावर कारवाई करणेबाबत

**(४७) * २०८३८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सी. सी. आय. प्रोजेक्ट प्रा. लि. समूह या विकासकाने ‘रिव्हर्ली पार्क’ गृहनिर्माण प्रकल्पासाठी सुरक्षा निकषांचे पालन न करता केलेल्या खोदकामामुळे मेट्रोच्या मागाठाणे स्थानकाजवळील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील सार्वजनिक रस्ता खचून वाहतुकीस धोकादायक झाला असल्याची, तसेच पर्जन्य जलवाहिनीला देखील तडे गेले असल्याने मागाठाणे मेट्रो स्थानकाला देखील धोका निर्माण झाला असल्याची गंभीर बाब दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागाठणे मेट्रो स्टेशननजीकच सुरक्षा निकषांचे पालन न करता गृहप्रकल्पासाठी खोदकाम करणाऱ्या विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर ठिकाणी प्रकल्प प्रस्तावक यांचेमार्फत इमारतीच्या पाया भरणीकरिता काम सुरु असताना दिनांक २४/०६/२०२३ रोजी दक्षिणेकडील बाजूस रिवाली पार्क इमारतीच्या पार्किंगजवळ, पूर्वस मागाठाणे मेट्रो स्टेशनच्या उत्तरेकडील जिन्याजवळ, पश्चिम द्रुतगती मार्गाच्या सेवा मार्गिकेच्या खालील तसेच उत्तरेस असलेल्या अंतर्गत रस्त्यालगतच्या भागाजवळील माती खचली होती व दिनांक २८/०६/२०२३ रोजी मागाठाणे मेट्रो स्टेशनच्या उत्तरेकडील जिन्यालगत अस्तित्वात असलेल्या पर्जन्य जलवाहिनीच्या मॅनहोलचा काही भाग पाण्याच्या दबावामुळे क्षतिग्रस्त झाल्यामुळे पावसाळी गटारातील पाणी मोठ्या प्रमाणात खोदकामाच्या ठिकाणी जमा होण्यास सुरुवात झाली व त्यामुळे बाजूला असलेल्या मातीचा काही भाग ढासळला, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर घटनेनंतर प्रकल्प प्रस्तावक यांना पुढील प्रस्तावित काम बंद करण्याकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ ए अंतर्गत नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच उप महाव्यवस्थापक, एमएमआरसीएल यांनी संबंधित विकासकास मेट्रो प्राधिकरणामार्फत देण्यात आलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात आले असून, काम बंद करण्याकरिता नोटीस देखील बजावण्यात आली आहे. तसेच सदर घटनेबाबत कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई – विरार शहर महानगरपालिकेत कर संकलनामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करणेबाबत

**(४८) * २०५६८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई -विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उभारण्यात येत असलेल्या अनधिकृत बांधकामांना बनावट घरपट्टी आणि पाणीपट्टीच्या पावत्या देवून महानगरपालिका कर्मचारी / अधिकाऱ्यांनी सदरहू रक्कमेचा अपहार करून महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केल्याची बाब दिनांक १६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी कराची खोटी पावती पुस्तके छापून नागरिकांकडून विक्रमी कर वसुली करून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक केल्यासंदर्भात कर निरीक्षक, प्रभारी सहायक आयुक्त आणि रोखपाल यांची विभागीय चौकशी सुरु आहे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू गैरव्यवहारात सहभागी असलेल्या वसई-विरार शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अहवालानुसार मालमत्ता कर विभागात घरपट्टीच्या बनावट पावत्या दिनांक ०९/०१/२०२३ रोजी भरल्याची बाब निदर्शनास आली होती.

सदर बनावट पावती पुस्तके निदर्शनास आल्यावर महानगरपालिकेमार्फत नालासोपारा पोलीस स्टेशन येथे अज्ञाताविरूध्द दिनांक ०७/०४/२०२३ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वसई विरार महानगरपालिकेने सनदी लेखापाल यांच्यामार्फत मालमत्ता कराच्या पावत्यांच्या तपासणीचे काम सुरू आहे. तसेच, संबंधितांकडून खुलासा देखील मागविण्यात आला आहे. उक्त तपासणीनंतर पुढील नियमोचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना ते नांदेड दरम्यानच्या समृद्धी महामार्गाच्या कामाबाबत

**(४९) * २०१९८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या जालना ते नांदेड ह्या द्रुतगती मार्गाचा रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा बनविण्याबाबत राज्य शासनाने मूळ आराखड्यात मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूळ आदेशात मंजूरी असताना सदर रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा बनवण्या ऐवजी तेथे डांबरी रस्ता करण्यात येत असल्याबाबत माजी मुख्यमंत्री महोदयांनी व लोकप्रतिनिधी यांनी नाराजी व्यक्त केली आहे,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील इतर समृद्धी महामार्गाप्रमाणे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने डांबरी रस्ता करण्याबाबतचा निर्णय रद्द करण्यासंदर्भात शासनाने चौकशी करुन जालना ते नांदेड दरम्यान समृध्दी महामार्गाची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गाच्या प्रस्तावित सविस्तर प्रकल्प अहवाला नुसार प्रस्तावित महामार्गाचा मुख्य रस्ता व सेवा रस्ते हे Flexible Pavement मध्ये प्रस्तावित आहेत. तसेच महामार्गाचे आंतरबदल (Interchange) व पथकर नाके येथील रस्त्याचा पृष्ठभाग हा Rigid Pavement मध्ये प्रस्तावित केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेकडून पथ विक्रेता अधिनियम, २०१४ ची योग्यरित्या अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(५०) * १८९९५ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील पदपथावर अनधिकृत पथविक्रेत्याचे दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत असून त्यामुळे रस्ता व पदपथावर नागरिकांना रहदारीस व वाहतुकीस अडथळा होऊ नये यासाठी पथ विक्रेता अधिनियम, २०१४ हा राज्यात लागू केला असूनही पुणे शहरातील पथारी, हातगाडी, स्टॉलधारकांवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून पथविक्रेता कायदयाचे उल्लंघन करुन कारवाई केली जात असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिनियमानुसार पथविक्रेता योजनेत विविध तरतूदी समाविष्ट असून पथविक्रेत्याचे सहा महिन्यात अचूक सर्वेक्षण, पथविक्रेता प्रमाणपत्र तसेच नोंदणीसाठी पात्रतेचे निकष, प्रमाणपत्र देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे, पथविक्रेता प्रमाणपत्र-ओळखपत्र देण्याच्या अटी व शर्ती वैधता कालावधी इत्यादी संदर्भातील सर्व कामे संबंधित महानगरपालिका करीत असल्यामुळे पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून कारवाई करताना पोलीस व सिक्युसिटी फोर्सचा गैरवापर करुन गोरगरीब व्यावसायिकांवर अन्याय केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेकडून पथविक्रेता कायदयाची योग्यरित्या अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच पथविक्रेता धोरणाची योग्यरित्या अंमलबजावणीसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पथ विक्रेता अधिनियम २०१४ ची योग्य अंमलबजावणी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेकडून पथ विक्रेता अधिनियम २०१४ मधील तरतूदीनुसार पुणे शहरातील रस्तापदपथांवरील अनधिकृत तसेच नोंदणीकृत व पुनर्वसन केलेल्या ज्या पथ विक्रेत्यांकडून ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे वारंवार उल्लंघन केले जाते, त्यांच्यावर अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असल्याचे आयुक्तांनी कळविलेले आहे.

जून, २०२३ अखेरपर्यंत पुणे शहरातील रस्ता पदपथांवरील एकूण २३,१०५ एवढया पथ विक्रेत्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करून त्यांची संगणकीय नोंदणी पूर्ण करण्यात आलेली आहे.

त्यांपैकी अंदाजे एकूण १८००० एवढया पथ विक्रेत्यांना प्रमाणपत्रांचे रितसर वाटप करून त्यामधील एकूण ११८५८ एवढया पुणे शहरातील नोंदणीकृत पथ विक्रेत्यांचे शहरातील विविध रस्ता पदपथांलगतच्या जागेवर घोषित केलेल्या ५२५ एवढया हॉकर्स झोनचे जागेनिहाय मान्य करण्यात आलेले दैनंदिन परवाना शुल्काची आकारणी करून परवाना शुल्क लागू करण्यात आलेले आहे.

(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पथ विक्रेता अधिनियमाची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

• पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्वेक्षणात आढळलेल्या १८६०३ पथ विक्रेत्यांची प्राथमिक यादी दिनांक ३१/०३/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

• त्यामध्ये ७२३ हरकती प्राप्त झालेल्या आहेत.

• महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पथ विक्रेत्यांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आलेले असून हरकतींची संख्या जास्त असल्याने अंतिम यादी शहर फेरीवाला समितीच्या मान्यतेनंतर प्रसिध्द केली जाणार आहे.

• अंतिम यादी प्रसिध्दीनंतर शासन नियमावलीनुसार पात्र पथ विक्रेत्यांना ओळखपत्र, प्रमाणपत्र वाटपाची कार्यवाही महानगरपालिकेकडून नियोजित असल्याचे आयुक्तांनी कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील २६ चौकांमधील सिग्नल यंत्रणा बंद असल्याबाबत

**(५१) * १९५०० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील २६ चौकांमधील सिग्नल यंत्रणा अनेक महिन्यांपासून बंद असल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाल्याची बाब माहे मे,२०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली

आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चौकांमध्ये दररोज सकाळी आणि संध्याकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने, ही कोंडी सोडविण्यासाठी सिग्नल यंत्रणा दुरुस्त करून कार्यरत करावी असे पत्र वाहतूक पोलीस प्रशासनाने महानगरपालिकेच्या विदयुत विभागाला दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील विविध रस्ते आणि चौकांमधील वाहतुकीचे नियमन वाहतूक पोलिसांच्या माध्यमातून केले जाते मात्र शहरातील रस्त्यांची कामे, चौकांमधील कामे आणि सिग्नल व्यवस्था दुरुस्ती करण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर आहे त्यामुळे महानगरपालिकेने शहरातील २७७ लहान मोठ्या चौकांमध्ये सिग्नल यंत्रणा बसवली, यातील २६ चौकांमधील सिग्नल व्यवस्था अनेक महिन्यांपासून विविध कारणाने बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) पुणे शहरातील एकूण २७७ चौकांमध्ये स्वयंचलित वाहतूक यंत्रणा बसविण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागामार्फत सदर २७७ सिग्नलच्या देखभाल दुरूस्तीचे काम करण्यात येते व संचालनाचे काम पुणे पोलीस (वाहतूक विभाग) यांच्यामार्फत करण्यात येते.

माहे, एप्रिल, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात उप आयुक्त, वाहतूक पोलिस, पुणे शहर यांनी २६ सिग्नल बंद असल्याचे कळविले होते.

या २६ पैकी एका ठिकाणी मेट्रोच्या कामामुळे सिग्नल बंद असून मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतरच सिग्नल चालू करणे शक्य आहे. तसेच एक सिग्नल लष्कर विभागाकडील असून त्यांच्यामार्फत देखभाल दुरूस्ती केली जाणार आहे.

उर्वरित २४ चौकांमधील सिग्नल यंत्रणा चालू असून तेथील वाहतूक नियोजनासाठी संबंधित वाहतूक पोलिसांनी सिग्नल बंद केल्याचे वाहतूक विभागाच्या निदर्शनास महानगरपालिकेमार्फत आणण्यात आलेले आहे.

वाहतूक नियोजनासाठी सिग्नल बंद ठेवल्याचे नागरिकांना माहित नसल्याने सिग्नल यंत्रणा बंद असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येतात.

याबाबत विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका यांच्या कार्यालयाकडून दिनांक २४/०५/२०२३ च्या पत्रान्वये पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, पुणे शहर यांना सद्य:स्थिती कळविण्यात आले असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.